मदे मत्सरे सांडिली स्वार्थबुद्धी।
प्रपंचीक नाही जयाते उपाधि।
सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥५३॥

अर्थ - जो निरहंकारी असून कधी कुणाचा व्देष करीत नाहि, ज्याने मनाचा कोतेपणा टाकला आहे, ज्याला संसाराचे बाह्य पाश नसतात आणि जो नेहमी नम्र व प्रसन्न वाणीने बोलतो असा जो पुरुष भगवंताच्या जगातील उत्कृष्ट भक्त होय.

स्पष्टीकरण - जीवनाचा असा नियम आहे की माणूस सतत ज्याचे चिंतन करतो त्याचे गुण त्याच्या मनामध्ये उतरतात. अभक्त आपल्या देहाचे व प्रपंचाचे सतत चिंतन करतो. त्यामुळे तो संकुचित, स्वार्थी बनतो. याउलट भगवंताच्या स्मरणात देहाला विसरणारा भक्त देवासारखा बनत जातो. त्याची स्वार्थबुद्धी आपोआपच मरुन जाते. त्यामुळे दृश्याचे प्रेम सुटते, मग दृश्य असून नसल्यासारखे होते. दृश्य मिथ्या ठरल्यावर भक्ताला प्रपंच असला तरी त्याचा पाश उरत नाही. ह्या अंतरंगातील लक्षणाचे व्यक्तस्वरुप त्याच्या वाणीत आढळते. त्याचे बोलणे अतिशय नम्रपणाचे असते. त्या बोलण्यात नेहमी प्रसन्नता आढळते.

मद, मत्सर आणि स्वार्थबुद्धी यांनी या भक्ताला सोडून दिले आहे. त्यांना रहायला आता जागा नाही. अशा या भक्ताला प्रापंचिक उपाधी नसते. संतांना प्रपंच असतो पण प्रपंचाचे बंधन नसते. एकनाथ महाराज, गोंदवलेकर महाराज, गोरा कुंभार यांना प्रपंच होता परंतु त्यांच्या प्रपंचाने परमार्थात कधी व्यत्यय आणला नाही. किंवा त्यांच्या परमार्थावर मात केली नाही. रामकृष्ण म्हणत - होडी पाण्यात असायला हरकत नाहि पण होडीत पाणी शिरता कामा नये. तसे संत प्रपंचात असतात पण प्रपंच त्यांच्यामध्ये नसतो. अनेक वारकरी संत कमलपत्रासारखे प्रपंचात राहिले. प्रपंच हा त्यांच्या चिंतेचा अथवा चिंतनाचा विषय असत नाही. संतांना प्रपंच असतो. कधी दारिद्र्य तर कधी ऐश्वर्य पण त्याची उपाधी त्यांना जडलेली नसते. सामान्य माणसे उपाधी वाढवतात या उपाधी माणसाला मोहग्रस्त करुन घोटाळ्यात टाकतात. प्रपंचातल्या उपाधी या गाठोड्यासारख्या आहेत. तरुन जाणाऱ्या

© www.madhaveeraghuveer.com

दृष्टीने त्याचा उपयोग जर नाहीच उलट अडथळाच होतो.

संतांच्या अंतःकरणात मद मत्सराला स्थान नसते. एखाद्या प्रसाधनवस्तूचा प्रचारक वयोवृद्ध पतिव्रतेकडे यावा. पण त्याच्या कुशल लाघवी बोलण्याचा काही प्रभाव पडू नये. तसे संतांपुढे या मदमत्सरस्वार्थांचे होते. मद/स्वाभिमानाचे रूप घेऊन येतो. मत्सर महत्त्वाकांक्षेचा वेश परिधान करतो आणि स्वार्थबुद्धी प्रपंचाचे गोडवे गाते. संग्रहाचे समर्थन करते. मात्र संत या सर्व वाईट विकारांपासून दूर असतात. सहजिकच त्यांच्या वाणीतून ही प्रसन्नता व्यक्त होत असते. संतांचे बोलणे चांगले असते. चांगल्यासंबंधी असते व चांगल्याकरता असते. ते नेहमीच नम्रतेने, हळुवारपणे, सौजन्यपूर्ण मधुर शब्दात बोलतात. याविषयी ज्ञानेश्वर माऊली म्हणतात:

जैसे साच आणि मवाळ । मितुले परी रसाळ ।
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥
विरोधु वादबळु । प्राणितापदाळु ।
उपहासु छळु । वर्म स्पर्शु ॥
आटु वेगु विंदाणु । आशा शंका प्रतारणु ।
हे संन्यासिले अवगुणु । जिया वाचा ॥

बोलण्यात वादविवाद, विरोध, संतापजनक वक्तव्य, उपहासात्मक छळ करणारे, वर्मावर घाव घालणारे, अडवणूक करणारे, वेगपूर्ण कपटपूर्ण, आशाळभूतपणे शंका घेणारे किंवा दुसऱ्याची प्रतारणा करणारे हे सगळे अवगुण नसावेत. त्यांचे बोलणे कृपावात्सल्याने भरलेले असते. जणू आईबाप-वात्सल्य साकार झाल्याप्रमाणे मंजुळ खळखळून वाहणाऱ्या गंगेप्रमाणे पवित्र आणि उत्कट असते. सत्याला धरून असले तरी कठोर नसते. त्यात फापटपसारा नसतो. जणू अमृतावर तरंग उठावेत असे शब्दांचे माधुर्य असते.

तुकाराम महाराज आणि समर्थ यांची भाषा काही प्रमाणात याला अपवाद आहे. परंतु आई कधी कधी मुलावर संतापते आणि 'मर मेल्या' असे म्हणते. पण त्याचा अर्थ चिरंजीव हो असा असतो.

Systematically Ellimination - व्यतिरेक x अन्वय
चिंता - चिंतन



वेळ कसा घालवावा?

क्रमी वेळ जो तत्वचिंतनुवादे।
न लिंपे कदा दंभवादे विवादे।
करी सूखसंवाद जो उगमाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥५२॥

कसा घालवू नये?

अर्थ - जो स्वतः परमात्मस्वरूपाचे सतत चिंतन करतो आणि ते स्वरूप इतरांना समजावून देण्यात आपला काळ आनंदात घालवतो, फसवा युक्तिवाद आणि गैरलागू वितंडवाद या दोघांनी जो कधी लिप्त होत नाही, आणि विश्वाचा आरंभ कसा झाला याबद्दल जो आपलेपणाने संभाषण करतो असा तो पुरुष सर्वोत्तम भगवंताचा जगातील उत्कृष्ट भक्त होय.

स्पष्टीकरण - समर्थांचा भक्त विवेकप्रधान आहे. तो भगवत्स्वरूपाचे चिंतन, मनन करतो आणि संभाषणाच्या रूपाने जिज्ञासूंना ते समजावून देतो. एकांतात मनन करताना तो स्वतःशी संवाद करतो. शरीरातील जडतत्वांचे चिंतन करीत, त्यांचा निरास करीत चैतन्यमय आत्मतत्वापर्यंत पोहोचणे म्हणजे तत्वचिंतन. म्हणजेच स्वतःचे खरे स्वरूप समजावून घेणे. शंकराचार्यांचे आत्मषटक किंवा समर्थांचे सोलीव सुख ही तत्वचिंतेची उदाहरणे आहेत.

असा अनुभव जो घेतो तो मनुष्य दंभ, वाद-विवाद यात मुळीच पडत नाही. उगमाचा संवाद म्हणजेच आत्मसंवाद सत्पुरुष मिळालेला वेळ परमार्थ, अध्यात्म, तत्वज्ञान, सद्धर्म, मोक्षसाधना यात घालवतात. अनेक आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन करतात आणि स्वतःला जे समजले ते इतरांपर्यंत पोहोचवतात. श्रवण मननाच्या पाठोपाठ निदिध्यास आणि आचरण आवश्यक आहे. असे हे सत्पुरुष कधीही दंभाने बोलण्यात किंवा वितंडवादात वेळ वाया घालवत नाहीत. त्यापेक्षा सृष्टीचा आरंभ कसा झाला? जीव, जगत्, जगदीश यांचा परस्पर संबंध, सत्य याचा विचार करतो आणि जाणत्यांबरोबर याविषयी मनमोकळी चर्चा करतो. कोणत्याही विषयाचे विवेचन जेव्हा शास्त्रपातळीवर होते तेव्हा ते मूलगामी ठरते. प्रगतीचा तो एक महत्वाचा टप्पा ठरतो. बोधयन्तः परस्परम्।

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्।
व्यसनेन च मूर्खाणां निद्रया कलहेन वा।

© www.madhaveeragnuveer.com

सदा आर्जवी प्रीय जो सर्वलोकी।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी।
न बोले कदा मिथ्यवाचा त्रिवाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५३॥

अर्थ - ज्याचे वागणे अगदी निष्कपट व सरळ असल्याने जो सर्वांना आवडता असतो, ज्याचा विवेक कधीही मलिन होत नाही, जो केव्हाही खरेच बोलतो. जो कधीही खोटे वा विसंगत बोलत नाही तो पुरुष सर्वोत्तम भगवंताचा उत्तम भक्त होय.

स्पष्टीकरण - (अकारण) जनप्रियत्व आणि विवेकसंपन्न सत्यभाषण ही दोन लक्षणे समर्थांना विशेष पसंत आहेत. भक्त निष्कपट असतो पण बावळट नसतो. तो कोणाला फसवत नाही आणि कोणाकडून फसवला जात नाही. कपटी माणसाचे कपट जाणून तो त्याच्याशी सरळ वर्तन करतो. या निर्व्याज (Transparent) वागण्याने तो सर्वांना आवडतो. त्याचा तोल कधीही ढळत नाही. त्याच्या जीवनात विवेकाचे राज्य चालते. त्यात खोटेपणाला, गैरशिस्त भाषणाला, व्यर्थ व विसंगत बोलण्याला वावच मिळत नाही. किंबहुना असा भक्त जे बोलतो ते घडून येते.

गोड बोलण्यावर समर्थांचा विशेष भर होता. राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तदनंतरे॥ हे त्यांचे वचन सांसारिकांच्या दृष्टीने मौलिक आहे. मात्र गोड बोलणे आणि सत्य बोलणे ही तारेवरची कसरत आहे. सत्य हे क्वचितच प्रिय असते. आर्जवी वृत्ती म्हणजे लाळघोटेपणा नव्हे. त्यात मनाची सरलता आणि निष्कपटता दिसून येते. या श्लोकात प्रिय बोलण्यासाठी सदा, सत्य बोलण्यासाठी सर्वदा तर खोटे बोलणे टाळण्यासाठी न कदा असे शब्दप्रयोग आहेत. खोटे कधीच बोलू नये. साधकाने लोकसंग्रह काळजीपूर्वक करावा.

आर्जव म्हणजे सरळपणा पण तो फटकळ किंवा तुसडा नसतो. वाईटाला वाईट म्हणताना अपशब्द वापरले पाहिजेत असे नाही. स्पष्ट सरळ बोलणे हे शिष्टाचाराला धरूनही करता येते. आणि तेच समर्थांना अभिप्रेत आहे. मात्र जे पथ्याचे व हितकारक असते ते बहुतेक अप्रिय असते.

अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः।

© www.madhaveeraghuveer.com

औषध चवीला गोड असणे अपवादात्मकच आहे. वरवर गोड बोलणे तर दांभिकतेचा, वंचकतेचा दोष लागू शकतो. मात्र निजकल्याणाची इच्छा असेल तर माणसाने हिताचे, पथ्याचे आहे ते गोड मानून घ्यायला शिकले पाहिजे.

खरे तर माणसाला सरळ आणि स्पष्टपणाचेच आकर्षण वाटले पाहिजे. विचारी माणसाला ते आवडेलही आणि म्हणूनच तुकाराममहाराजांचे अभंग आदराने, प्रेमाने वाचले जातात. आत्यंतिक हित हीच सत्याची कसोटी आहे. त्यामुळे संत जे बोलतात ते त्रिवार सत्यच असते. ते पूर्ण निस्वार्थी आणि सर्वभूतहिते रताः असतात. त्यांच्या वाणीला मिथ्यत्वाचा स्पर्श होत नाही. लोकांमध्ये ते अत्यंत प्रिय असतात.

© www.madhaveeraghuveer.com

येथे सुखे रहावे एकांताच्या वास। (शून्यात एकटेपणा) नाही गुणदोष अंगा येत। वर्तुळात आपण ... शून्य व वर्तुळ दोन्ही सारखे नसतात असतात.

Date 26.8.13

(एकाकीपणा / एकांत)

Loneliness
Solitude

सदा सेवि आरण्य तारुण्यकाळी।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं।
चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५०॥

<u>अर्थ</u>- तरुणपणी जो निर्जन ठिकाणी राहून एकांतवासात आपला काळ घालवतो, जनमानसातील ईश्वराबद्दल असणाऱ्या नाना कल्पनांच्या गोंधळात जो कधी अडकत नाही, आणि ज्याच्या मनातील भगवंताची श्रद्धा अगदी पक्की असते, अविचल असते असा पुरुष सर्वोत्तम भगवंताच्या जगातील उत्कृष्ट भक्त होय.

<u>स्पष्टीकरण</u>- याच जन्मात भगवंताला वश करून घेणारे भक्त तरुणपणापासूनच त्याचा ध्यास घेतात. भगवंताचे पोटभर चिंतन करायला मिळावे म्हणून ते अरण्यातील एकांतवास पत्करतात. अनेक वर्षे अखंड चिंतन करून मनाचे उन्मन झाले की मग तो लोकांतात येऊन सुरक्षितपणे राहू शकतो. कल्पनांच्या गोंधळात तो सापडत नाही. त्याच्या चिंतनाची खोली वाढत जाते तसतसे त्याचे मन निःसंदेह होत जाते. त्याची निष्ठा दृढ होत जाते.

इथे अरण्य म्हणजे एकांतवास. सदा शब्द सातत्य दर्शवतो. यातून वृत्ति अंतर्मुख होण्याला मदत होते. मुळातच वृत्ती बहिर्मुख असेल तर एकांतातही मनात माणसांची गर्दी असते. उलट महाराज जनकासारखा महात्मा भर दरबारातही एकांताचा अनुभव घेतो. तरुणपणी अरण्यवास स्वीकारण्यात पुरुषार्थ आहे. पण म्हातारपणी एकांतवासात जाण्यामध्ये अगतिकता आहे. इंद्रिये सक्षम असताना वैराग्य हवे. वैतृष्ण्य हवे. म्हातारपणचे वैराग्य हे कोंदलेले वैराग्य झाले. अङ्गं गलितं पलितं मुण्डम्।

गृहस्थाश्रमी माणसाने वर्षातून दोनदा तरी जीवनाची घडी नीट बसवण्यासाठी व आत्मपरीक्षणासाठी एकांतात जाऊन रहाणे आवश्यक आहे. माणसांमध्ये सारखे राहून चित्त मलीन होते. विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि। अशी सूचना गीतेने केली आहे. लोकसंग्रह सुरु करण्यापूर्वी १२ वर्षे समर्थ टाकळी येथे एकांतवासात राहिले होते. तुकाराम महाराज देहजवळ भंडारा येथे जाऊन रहात. नाथमहाराजांनी साधकदशेत असताना शूलभंजन टेकडीवर जाऊन साधना केली.

[illegible]

© www.manachebhaveraghuveer.com

अशा वेळी वैराग्य पणाला लागते. देहबुध्दी कमी होत जाते.
एकांतवासात निश्चय दृढावतो. निश्चयाचे बळ | तुका म्हणे हेचि फळ | जीवनात कोणतेही उच्च ध्येय साध्यासाठी निश्चय आवश्यक आहे. संकट, विरोध, एकाकीपण यामुळे निश्चय ढळता कामा नये.

अरण्यवासात मिळणारे सुख हे वैषयिक सुख नाही. म्हणून इंद्रियाद्वारे त्याची प्राप्ती होणार नाही. तिथे सुखसोयी नाहीत, थंडी उन वारा पाऊस यांना तोंड द्यावे लागेल. वातावरणाचा भरवसा नाही. खाण्यापिण्याची हवी तशी व्यवस्था नाही. जेवण्या झोपण्याची वेळ सांभाळता येईलच असे नाही. शरीराला कष्ट आहेत. पण जे सुख भोगायचे आहे ते शरीर पातळीपेक्षा वरचे सुख आहे(-४४).
अरण्यात राहणे हा पारमार्थिक साधनेचा भाग आहे. त्यातून स्वावलंबन घडते. निर्भय वृत्ती होते. सोशिकपणा वाढतो. ध्यानाची सवय लागते मनाला वळण लागण्याआधी शरीराला वळण लागावे लागते. इथे अरण्य हे उपलक्षण आहे. एकांताची सवय व आवड निर्माण होणे हे मुख्य साधन आहे.

आपण जी सुखदुःखे भोगतो त्यात प्रत्यक्ष अनुभवाचे प्रमाण फार कमी असते. कल्पनेचा बाटच फार मोठा असतो. सामान्य माणसे कल्पनेनेच अधिक दुःखी होतात. संत निर्लेप असल्याने सुखदुःखाचे मोजमापही अलिप्ततेने करु शकतात. त्यांचा निश्चय दृढ असल्याने त्यांच्या मनाला चंचलता येत नाही. ध्येयसिध्दी दुरावते ती निश्चयाच्या शिथिलतेने. ओले शेण किंवा ओले लाकूड पेटत नाही. धुमसत राहते. पण कापूर चटकन पेटतो. निश्चयी माणसाच्या मनाचे तसेच होते. दृढनिश्चयी माणसावर संकटे येत नाहीत असे नाही. पण तो आपल्या ध्येयापासून कधीही च्युत होत नाही.
तुटो हे मस्तक फुटो हे शरीर | नामाच्या गजर सोडू नये ||
अशी त्याची धारणा असते. त्यामुळे तो संतपदावर चढतो व धन्य होतो.

भक्ती म्हण घेतले माझे।
चरण महान आहेत तुझे॥

तुकाराम महाराज

नसे मानसी नष्ट आशा दुराशा।
वसे अंतरी प्रेम पाशा पिपाशा॥
ऋणी देव हा भक्तिभावे जयाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥ ७॥

अर्थ - ज्याच्या मनातील दुष्ट वासना नाहिशा होतातच पण सार्‍या भोगवासना देखील लय पावतात. भगवंताला प्रेमाने बांधून ठेवण्याची ज्याच्या अंतरी तळमळ आढळते आणि ज्याच्या प्रेमाने व शरणागत वृत्तीने भगवंत उपकारबध्द होऊन राहतो, असा तो पुरुष सर्वोत्तम भगवंताचा जगातील उत्कृष्ट भक्त होय.

स्पष्टीकरण - भगवंत जसा अनंत तसा त्याचा प्रेमभावदेखील अनंत असतो. म्हणून भगवंताचे प्रेम कितीही भोगले तरी त्या भक्ताची प्रेमतृष्णा शांत होत नाही. भक्त आपल्या भक्तीने भगवंताला वश करून घेतो. भगवंत उपकारबध्द होतो ही भक्तीची भाषा आहे. भक्ताच्या जीवनात भक्तीचा परमोत्कर्ष प्रत्यक्ष अनुभवास येतो. त्याचे मन सरोवरासारखे निर्मळ असते.

दुराशा म्हणजे भगवंतापासून दूर नेणाऱ्या इच्छा! नष्ट आशा म्हणजे विनाशकारी इच्छा! दुसऱ्याचे वाईट चिंतणे. खऱ्या भक्ताच्या मनात मानवजातीबद्दल प्रेम असते. त्यामुळे तो कोणाचे वाईट चिंतत नाही. तो कधीही तुसडा असत नाही. या सर्व सृष्टीत त्याला भगवंतच नटलेला असतो. आपली कर्तव्ये तो दक्षतेने पार पाडतो. भगवद्प्रेमाची त्याला तहान लागते.

त्याच्या मनात जीवनातील सुखस्वास्थ्य नष्ट करणारी दुष्ट आशा नसते. धन, धान्य, ऐश्वर्य, स्त्री-पुत्र यांचा त्याला मोह नसतो. झाडाखाली बसलेल्या गुरांबद्दल झाडाला जसे वाटेल तसे त्याला आप्तस्वकीयांबद्दल वाटते. सर्व गोष्टी त्याने प्रारब्धावर सोडलेल्या असतात याचा अर्थ तो रुक्ष, कोरडा असतो असे नव्हे. कारण त्याचे अंतःकरण भगवंताच्या प्रेमाने भरलेले असते. हे प्रेम देवाकडून काहीही मागत नाही. या भक्तिसुखाला समर्थ पिपासा म्हणतात. भक्ताच्या अंतःकरणातील ईश्वराचे प्रेम इतके उत्कट असते की भक्तिभावाने ईश्वर त्याचा ऋणी होतो. आणि मग भगवंत भक्तासाठी काहीही करायला तयार होतो. नामदेवासारखे पुंडलिक भक्त भगवंताची खरड काढताना दिसतात.

शरीराचे अवयव नसते एकमेकांना मदत करताना निरपेक्ष तसेच संतांसाठी सर्वजीव हे आपलेच असतात



४१ ते ५६ - धन्यदशक - Climax

Transparent

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू।
स्नेहाळू कृपाळू जनीं दास पाळू।
तया अंतरी क्रोध संताप कैंचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५६॥

अर्थ - अनाथ व दुःखी जीवांवर जो दया करतो, जो स्वभावतः हळुवार अंतःकरणाचा आहे; ममताळू आहे. जो मेहरबान आहे आणि शरण आलेल्यांचा जो सांभाळ करतो, त्याच्या अंगी राग आणि त्रास असत नाही. असा पुरुष भगवंताचा उत्तम भक्त होय.

स्पष्टीकरण - भक्ताला भगवंताचे दर्शन झाल्यावर तो स्वतःच्या बाबतीत कृतकृत्य होतो. मग तो केवळ परोपकारापुरताच उरतो. आपल्याभोवती पसरलेली अज्ञानी, दुःखी, दीन जनता पाहून त्याचे दयामय अंतःकरण त्याला स्वस्थ बसू देत नाही. अत्यंत हळुवारपणाने लोकांचे दुःख तो समजून घेतो. त्यांच्याशी मित्रत्वाचे नाते जोडून तो त्यांच्यावर मेहरबानी करतो. अशा दीन, दुःखी लोकांचे भले करण्यात तो रमून जातो. ते भगवंताचे काम आहे अशा श्रद्धेने तो लोकांच्या मदतीला धावून जातो. कुणी त्याच्यावर नाराज झाले, रागावले तरी तो त्रासून जात नाही. उलट जनतेची सेवा करायला मिळत आहे या विचाराने तो स्वतःला भाग्यवान मानतो.

दया हे संतांचे खास वैशिष्ट्य आहे. त्यात मदत करण्याचा भाव नसतो तर मातेचे वात्सल्य असते. खरा भक्त कधीही कठोर नसतो. तो स्नेहळू व कृपाळू असतो. एखादी गोष्ट मनाविरुद्ध घडली तरी त्याच्या मनात क्रोधाला थारा नसतो. अज्ञानपंकात रुतलेले लोक संतांना बघवत नाहीत. त्यांचे मन कळवळ्याने भरून जाते. पतितांविषयी त्यांना कधीही चीड, द्वेष वा तिरस्कार नसतो. तो कसाही वागला तरी त्यांचा जळफळाट होत नाही.

हे धन्य दशक या ५६व्या श्लोकाने संपत आहे. त्याचे वर्णन करताना समर्थ 'दास' हा शब्दच वापरत आहेत.

भगवान रामचंद्राची प्रार्थना करताना ते म्हणतात -

देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशकः।
आत्मबुद्ध्या त्वमेवाहं इति मे निश्चिता मतिः॥

तेव्हा जिवंत माणूस हा कितीही योग्यतेचा श्रेष्ठ पुरुष असला तरी तो परमेश्वराचा दासच आहे.

27.8.2013

वारकरी - पंढरीला नेमाने जातात व विठ्ठलाची भक्ति करतात.

जगी होईजे धन्य या रामनामें।
क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमें।
उदासीनता तत्वता सार आहे।
सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे॥५४॥

<u>अर्थ</u> - माणसाला जीवनात कृतार्थ व्हायचे असेल तर त्याने १. भगवंताचे नाम घ्यावे. २. धर्माने सांगितलेला आचार पाळावा. ३. नित्य नियमाने भगवंताची पूजा, आराधना व प्रार्थना करावी. ४. अंतःकरणात भगवंताची आवड व निष्ठा ठेवावी. खरे तर दृश्याबद्दल अनासक्ती किंवा विरक्ती हे सर्वांचे सार आहे. उदासीन माणसाच्या मनास सदैव स्वतंत्रता राहते.

<u>स्पष्टीकरण</u> - शरीर व मनाला उत्तम वळण लावून भगवंताचे सान्निध्य लाभणे हे कृतार्थ जीवनाचे लक्षण आहे. तसे वळण लागण्यासाठी सतत नामस्मरण, धर्मानुसार आचरण, भगवंताची सेवा म्हणून पूजा-अर्चा, उपासना आणि अंतःकरणात भगवंताविषयी प्रेम असणे या चार गोष्टी असायला हव्यात. त्यामुळे जीवनाला धन्यता प्राप्त होते. सामान्य माणूस अनेक बंधनांनी जखडलेला असतो त्यामुळे त्याला मनाचे स्वातंत्र्य उपभोगता येत नाही. ही बंधने तोडून मोकळे होणे म्हणजे उदासीनता, निःसंगता, निष्कामता. मनाने प्रपंचाचा संग टाकावा आणि भगवंताचा संग जोडावा हा परमार्थाचा सनातन नियम आहे.

रोज नियमितपणे बैठकीची उपासना ही घडली नित्यनेमात साधनेची वेळ, जागा, जपसंख्या, साधनपद्धती हे निश्चित करावे लागते. गांभीर्य किंवा तळमळ नसेल तर नित्यनेमात खंड पडतो. व्यावहारिक जगातसुद्धा यशस्वी होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतात. सचिन तेंडुलकर, भीमसेन जोशी इ.

परमार्थाला केवळ प्रपंच बाधक ठरत नाही तर आसक्ती-मुळे निर्माण होणाऱ्या गोष्टी बाधतात. ममत्व हे कौशल्याला बाधक ठरते. आसक्ती, ममता उणावली की मन मोकळे होईल आणि जे जे साधन तो करीत असेल त्याचे त्याला ओझे वाटणार नाही आणि म्हणूनच उदासीन, अनासक्त, अलिप्त, निर्मम झाले म्हणजे मन मोकळे होते असे समर्थ सांगतात.

Travel light

नको वासना वीषयी वृत्तिरूपे।
पदार्थी जडे कामना पूर्व पापे।
सदा राम निःकाम चिंतीत जावा।
मना कल्पना लेश तो ही नसावा ॥५८॥

अर्थ - मना, दृश्य वस्तूंमध्ये वृत्तिरूपाने वासना गुंतवून ठेवू नकोस या कारणानेच पूर्वपापामुळे दृश्यात कामना चिकटते. म्हणून सदैव भगवंताचे निष्काम चिंतन करावे. मनात कल्पना नसावी.

स्पष्टीकरण - पाच इंद्रिये पाच प्रकारे - शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पाच रूपांनी दृश्य आत घेतात. त्यापासून जीवाला तात्पुरते सुख मिळते. पाण्यावर जसे चक्राकार तरंग उठतात तसे मनावर वृत्तिंचे तरंग उठतात. हवे-नको या वृत्ति आहेत. वासना अतिशय सूक्ष्म असते. ती जेव्हा वृत्तीच्या रूपाने आकार धरते तेव्हा तिचे अस्तित्व उघडकीला येते. वासना सुखाच्या आशेने जीवाला दृश्यात गुंतवते. जीव हृदयातील भगवंताला विसरून बाहेर धावतो अशा बहिर्मुखपणाला पाप म्हणतात. ही सवय मोडण्यासाठी भगवंताचे चिंतन हाच एक उपाय आहे. बुद्धीला भगवंताच्या चिंतनात गुंतवून ठेवायचे व कल्पनेची गती थांबवायची.

एखाद्या गोष्टीबद्दलची इच्छा ही वृत्ती असते. ती बलवान नसते. पण वृत्तीचे अनेक तरंग तयार होतात तेव्हा त्यांचे कामनेत रूपांतर होते. पुन्हापुन्हा कामनापूर्ती करत गेले की त्याची वासना होते. त्यातून विषयसेवन घडते. त्याची पुनरावृत्ती होते. त्यासाठी इंद्रिये त्याला कासावीस करतात. चहा, सिगरेट, दारू, तंबाखू यांचे व्यसन लागते. हे सर्व पूर्वपापाने घडते असे समर्थ म्हणतात. हे पाप एका जन्माचे नाही तर अनेक जन्मांचे असतात. वासनेच्या या चक्रातून सुटका होण्यासाठी निष्कामपणे रामाचे चिंतन करावे. कर्ज घेणारा माणस जसे हप्ते भरतो तसे श्रवण, कीर्तन, सत्संग, दानधर्म, पारायण, अभ्यास, शिबिरे, वाचन याद्वारे ~~विषय~~ चिंतनाची नवी मालिका सुरू होईल. हे नवे संस्कार दृढ झाले की मनात एकही विषयतरंग, कल्पनालेश उरणार नाही. पुनर्जन्माचे कारणच संपेल. उपासनेचे रूप नवसाचे नसावे. इच्छा करताना अधिकाधिक उन्नत उदात्त अशा गोष्टींच्या प्राप्तीची करावी. असे करताना अस्वास्थ्य गळून पडते. प्रसन्नता भरून राहते. जीवन संतोषाने उजळते.

विविध प्रकारच्या कल्पना- नाही कलिना ने कलिन - Possitive
त्याच्या/त्याच्या कुम उपयोग ? Negative
कल्याण होत आहे रे आधी केलेचि पाहिजे

classmate
Date ______
Page ______

(अनुप्रास अलंकार) ~~Be Good, Do good & Get Good~~

मना कल्पना कल्पिता कल्पकोटी।
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी।
मनी कामना राम नाही जयाला।
अती आदरे प्रीति नाही तयाला॥५६॥

अर्थ - मना, नाना प्रकारच्या कल्पना करीत गेल्याने भगवंताचे दर्शन कदापि ही घडणार नाही. ज्याच्या अंतरी वासना असतात, त्याच्या अंतरी भगवंताविषयी कामना असत नाही आणि जर भगवंताविषयी कामना नसेल तर त्याच्यावर निष्ठायुक्त प्रेम नसते

स्पष्टीकरण - कल्पना जीवनात उपयोगी पडते पण तिला मोकाट सोडली तर धड प्रपंच नाही व धड परमार्थ नाही अशी अवस्था होते. भगवंत हवाच असे मनापासून वाटल्यावाचून त्याचे प्रेम निर्माण होणार नाही. मन उगीचच अनंत कल्पना करत राहते. दिशाहीन भटकंती करून मन थकून जाते. मनाची शक्ती व्यर्थ खर्च होत असते. अशा वेळी मन आपल्या पात्रतेचाही विचार करत नाही. राम भेटावा अशा नुसत्या कल्पनेने राम भेटणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष कृती करावी लागेल. विवेक, वैराग्य धारण करावे लागेल. दिनचर्या निश्चित करून आहारविहारांचे बंधन पाळावे लागेल. भगवंत प्रेमाने वश होतो. कामनेने नाही. भगवंताबद्दल आदर निर्माण होण्यासाठी सर्व कामना विसर्जित व्हाव्या लागतात. सूर्य आणि अंधार एकत्रितपणे नांदू शकणार नाही, तसेच विकार आणि भगवद्प्रेम एका अंतःकरणात राहू शकत नाही.

जहाँ काम तहाँ राम नहीं। जहाँ राम तहाँ काम नहीं॥ - कबीर

प्रयत्नालाच परमेश्वर समजावे आणि अंतःकरणामध्ये काहीतरी चांगले धरून उद्योगाला लागावे तरच प्रगतीची आशा आहे नाहीतर मनुष्याचे कल्याण होणार नाही. कल्याण होत आहे रे। आधी केलेचि पाहिजे। शास्त्रनिष्ठा न सोडताही माणसाला आपल्या प्रवृत्तीप्रमाणे आणि आवडीप्रमाणे साधना स्वीकारणे शक्य आहे.

ईश्वराला ओढ असते ती शुद्ध प्रेमाची. ते प्रेम ज्याच्या अंतःकरणात नाही, जे अंतःकरण कामनांनी बरबटलेले आहे, ते ईश्वरभेटीला पात्र होऊ शकत नाही.

मना राम कल्पतरू कामधेनू।
निधी सार चिंतामणी काय वानू।
जयाचेनि योगे घडे सर्व सत्ता।
तया साम्यता कायसी कोण आता॥६०॥

अर्थ - मना, भगवंताचे वर्णन मी काय म्हणून करू? त्याला कल्पतरू म्हणू का कामधेनू म्हणू? चिंतामणी म्हणू की कुबेराचा खजिना म्हणू की सारसर्वस्व म्हणू? त्यास म्हणू तरी काय? त्या भगवंताचा स्पर्श झाला की सर्व सामर्थ्य हातासी येते त्याच्याशी कोणाची कितीशी तुलना करावी?

स्पष्टीकरण - भगवंत सर्वोत्तम असल्याने त्याच्यासारखा तोच आहे. त्याची किंमत बरोबर समजावून सांगणे सोपे नाही. परंतु सामान्य माणसाला भगवंताचे मोठेपण सांगताना त्यांच्या कल्पनेतील गोष्टी उपमेसाठी घ्याव्या लागतात. पण या साधनांनी वासनापूर्ती होते पण वासना शांत होत नाही. परंतु भगवद्चिंतनाने वासना शांत होते, मन समाधान पावते. मनाला भगवंताचे सामर्थ्य प्राप्त होते. असे समाधान व सामर्थ्य देणारा भगवंत एकमेवाद्वितीय आहे.

एकदा रामाचा आश्रय घेतल्यावर अन्य आश्रयांची गरज काय? सद्गुरुसारिखा असता पाठिराखा। इतरांचा लेखा कोण करी॥ त्या श्रीरामाची तुलना कशाशी करणार? रामचंद्र कल्पतरू आहेत ते भक्ताच्या मनात वाईट कल्पना येऊच देत नाहीत. कामधेनू आहेत असे म्हणताना ते भक्ताला काहीही कमी पडू देत नाहीत. भगवंतच भक्ताचा संसार चालवतात. समर्थ जेव्हा रामाला निधी म्हणतात, तेव्हा तो सद्गुणांचा, कृपेचा, करुणेचा साठा आहे. प्रेमाचा व ऐश्वर्याचा साठा आहे असे असताना इतरत्र तोंड का वेंगाडावे? रामचंद्र असे चिंतामणी आहेत जे भक्ताच्या सर्व चिंता दूर करतात. या श्लोकाचा महत्त्वाचा अर्थ असा की — रामच जर कल्पतरू, कामधेनू, निधी, चिंतामणी असेल तर रामाला सोडून यःकश्चित गोष्टी मागणे हा करंटेपणा नाही का? तुझ्याखेरीज मला काही नको. असे रामाला सांगावे.

आवडीने भावे हरिनाम घेसी।
तुझी चिंता त्यासी सर्व आहे॥

© www.madhaveeraghuveer.com

उभा कल्पवृक्षातळी दुःख वाहे।
तया अंतरी सर्वदा तेचि आहे।
जनी सज्जनी वाद हा वाढवावा।
पुढे मागुता शोक जीवीं धरावा॥६१॥

अर्थ - एखादा माणूस कल्पवृक्षाच्या छायेत उभा असताना त्याने मनात दुःखाचा संकल्प केला तर त्याला जन्मभर दुःखच भोगावे लागेल. त्याचप्रमाणे एखादा माणूस संतांपाशी गेला आणि व्यर्थ चर्चा करु लागला तर त्याला पुढे जीवनात दुःखच भोगावे लागेल.

स्पष्टीकरण - संत हे कल्पवृक्षाप्रमाणे असतात. ज्या हेतूने आपण त्यांच्याकडे जातो त्या हेतूला अनुसरुन आपल्यावर त्याचा परिणाम घडतो. खरे म्हणजे संतांकडून भगवंताच्या अनुसंधानाची कला शिकायची असते. त्याऐवजी त्यांच्याशी निरर्थक वाद घालत बसले तर आपल्या जीवनातील दुःख काही नाहीसे होणार नाही.

माणूस जसा विचार करेल तसा तो होतो. वास्तुदेवता 'तथास्तु' म्हणत असते. आपण सुखाचे चिंतन केल्यास आपल्या वाट्याला सुखच येईल. अलीकडे नकारात्मक विचारसरणी वाढत चालली आहे. कल्पवृक्षाखाली उभा असल्याने दुःखाचे चिंतन करावे याचे समर्थांना वाईट वाटते. यावरुन आपणच आपल्या दुःखाला जबाबदार आहोत हे लक्षात येते. वाद घालून आपण आपले दुःख वाढवतो आणि माणसे तोडतो. परिणामी दुःख भोगावे लागते.

उदंड चाकरी होता। उदंड भाग्य होतसे।
उदंड कष्ट होता। उदंड खाया खातसे॥ — समर्थ.

माणसाला खरे तर त्याच्या योग्यतेपेक्षा अधिक मिळत असते. त्याचे श्रम वाया जात नाहीत. एक दाणा पेरावा आणि शंभर घ्यावे हा निसर्गाचा नियम आहे. ते ईश्वरी औदार्याचे द्योतक आहे. पण मनुष्य दुःखी होतो किंवा समजतो यात जी वस्तुस्थिती असते तिचे कारणही तोच असतो. माणसाची ही वृत्तीच घातक असते. त्यामुळे आपल्या हातांनी तो आपली हानि करुन घेतो.

© www.madhaveeragruveer.com

बृहदारण्यक - आत्मा अरे वा निदिध्यासितव्यः.

[illegible]



निजध्यास तो सर्व तुटोनि गेला।
बळे अंतरी शोक संताप ठेला।
सुखानंद आनंद भेदे बुडाला।
मनी निश्चयो सर्व खेदे उडाला॥ ६२॥

अर्थ - (वादाच्या नादी लागल्याने) माणसाचे स्वरूपानुसंधान क्षीण होऊन त्यात खंड पडतो. त्यात पूर्ण खंड पडला म्हणजे अशांतता व दुःख जबरीने मनात प्रवेश करून तिथे स्थिर होतात. शिवाय मतभेद झाल्याने मनाचे समाधान साफ लोपते. त्यामुळे भगवंताच्या अस्तित्वाची श्रध्दा पूर्णपणे उडून जाते.

स्पष्टीकरण - श्रीसमर्थ वाद आणि संवाद यामध्ये फरक करतात. दोन्हींमध्ये युक्तिवाद असतो. युक्तिवाद मांडताना बुध्दीचा उपयोग करावा लागतो. पण वाद खेळणारी बुध्दी अध्यात्मविद्येला घातक नाही तर मारक ठरते. संवाद भोगणारी बुध्दी शुध्द जिज्ञासेने प्रेरित झाल्याने अध्यात्मविद्येला पोषक ठरते.

निजध्यास म्हणजे स्वरूपाच्या प्राप्तीचा ध्यास. पवित्र आणि शांत होण्याचा ध्यास. अन्न पचावे लागते तसे शास्त्राध्ययन पचावे लागते. ज्यांना ग्रंथाध्ययन पचले नाही ती मंडळी कुठल्यातरी वादाचे मुद्दे उकरून काढतात. आणि दुःखी होतात. एकदा निजध्यास तुटला की द्वैत, भेद, स्पर्धा, तिरस्कार यांचा सुकाळ होतो. त्यातून सूडाची भावना वाढीला लागते. जेवढी विद्वत्ता जास्त तेवढी वादाची प्रवृत्ती जास्त! म्हणून गोंदवलेकर महाराज म्हणतात - 'मला विद्वान माणसाबद्दल आदर आहे पण प्रेम नाही.' वादाने कटकट वाढते.

Head Heart

निजध्यासाने मन अनुसंधानात रहाते. असे मन वादात रमत नाही वादातून दुःख निर्माण झाल्यास ईश्वरप्राप्तीचा निश्चय डळमळीत होतो आणि माणूस पुन्हा अधःपतित होतो.

समर्थांनी येथे 'निजध्यास' शब्द वापरला तो उपनिषदातील निदिध्यास शब्दाचे प्राकृत रूप असेल किंवा आपला म्हणजे आत्म्याचा ध्यास असाही अर्थ असेल. पहिला साधनाच्या दृष्टीने तर दुसरा साध्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे. रस्ता कितीही खडबडीत असला तरी गाडीच्या स्प्रिंग्ज, गाद्या चांगल्या असल्या म्हणजे रस्त्यातील खड्डे जाणवत नाहीत. निजध्यास, तत्वाचा अभ्यास, हे चांगल्यापैकी Shock Absorber आहेत. निजध्यास म्हणजे तोल सावरणे आहे.

© www.madhaveeraghuveer.com

मन मथुरा, दिल द्वारिका, काया काशी जान।
दस द्वारे का देहरा, तामे ज्योति पिछान (पहचान)

घरी कामधेनु पुढे ताक मागे।
हरीबोध सांडुनि वेवाद लागे।
करी सार चिंतामणी काचखंडे।
तया मागता देत आहे उदंडे ॥६३॥

अर्थ - ज्याच्या घरी कामधेनू आहे तो माणूस जर दुसऱ्याच्या घरी ताक मागू लागला तर ते अति हास्यास्पद होते. त्याचप्रमाणे आपल्यापाशी असणारे भगवंताचे ज्ञान बाजूला सारून जो शुष्क वादाच्यामागे लागतो त्याचे जीवन वाया जाते. समजा एखाद्याच्या हातात चिंतामणी आहे म्हणजे त्याच्या हातात सर्व काही आहे पण तो जर त्यास केवळ काचेचे तुकडेच मागू लागला तर ते त्याला हवे तेवढे मिळतील.

स्पष्टीकरण - माणसाची बुध्दी दुधारी शस्त्रासारखे काम करते. ती अनित्याकडे वळली तर दृश्याचे ज्ञान करून देते. पण जर का ती नित्याकडे वळली तर भगवंताचे ज्ञान करून देते. ती कामधेनू आहे. ते दूध प्राशन करून परमानंदाचा भोग घेण्याऐवजी अज्ञानी माणूस शुष्क वादाचे ताक मागत फिरतो. माणसाने बुध्दीचा उपयोग स्वार्थासाठी केला तर त्याला देहसुख मिळेल पण भगवंत मिळणार नाही.

माणसे अध्यात्मात शिरल्यावरही शैव-वैष्णव, वारकरी-धारकरी, असे वाद निर्माण करून अथवा नाना तऱ्हे, नाना फड निर्माण करून वादंग वाढवतात. ज्ञानेश्वर नाथ संप्रदायी का वारकरी संप्रदायी? तुकाराम महाराज सद्गुरु की जगद्गुरु? मग ते शंकराचार्यांच्या तोडीचे होते की नव्हते? असा काथ्याकूट कशासाठी करायचा? गीतेवरील एखादे भाष्य दुसऱ्या भाष्यापेक्षा श्रेष्ठ कसे हे हिरीरीने सांगतात. गोंदवलेकर महाराज म्हणतात - आम्ही दुकान थाटले आहे केशर-कस्तुरीचे, पण गिऱ्हाईक सारे हिंगमिऱ्याचेच!

सगळ्या इच्छा ज्याच्या आधाराने पुऱ्या करून घेता येतील असा अंतरात्मा सर्वांच्या हृदयात अक्षय्य वास करीत असताना निजध्यासाने त्याची कृपा संपादन करून घेण्याचे सोडून माणूस प्रापंचिक गोष्टीत सुखसमाधान मिळवण्याची इच्छा करतो हे किती विलक्षण आहे. माणसाला खरे सुख काय, कोठे, कसे आहे हे समजायला हवे.

हृदयामध्ये मी रामु। असता सर्व सुखाचा आरामु।
का भ्रांतासी कामु। विषयावरी ॥

अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना।
अती काम त्या राम चित्ती वसेना।
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा।
अती विषयी सर्वदा दैन्यवाणा॥ ६४॥

अर्थ - जो अति अज्ञानी असतो त्याची बुद्धी स्थिर रहात नाही. जो अति कामलंपट असतो त्याच्या अंतःकरणात भगवंत ठरत नाही. जो अति लोभी असतो त्याचे मन कधी स्वस्थ रहात नाही. सारांश जो अति भोगी असतो तो सदैव लाचार असतो.

स्पष्टीकरण - मानवी जीवनात व्यक्तिगत आणि सामाजिक अंगांचा समतोल रहाण्यासाठी वासनातृप्तीमध्ये सुवर्णमध्य साधला पाहिजे. उदा० कामवासना भोगणे गैर नाही पण ती अमर्याद भोगणे पाप आहे. तसेच प्रपंच नीट चालण्यासाठी किमान लोभ ठेवणे गैर नाही पण अति लोभी बनणे पाप आहे. सर्व दोषांचे मूळ विषयाधीनता-मध्ये सापडते. ज्याचे सुख दृश्यवस्तूवर अवलंबून असते तो सुखाच्या बाबतीत सर्वस्वी परावलंबी असतो. जगाने सुख दिले तरच त्याला सुख मिळते. म्हणून तो जगाशी लाचारपणे वागतो. त्यालाच समर्थ दैन्यवाणा म्हणतात. भगवंताचा भक्त गरीब असू शकतो पण दैन्यवाणा नसतो.

दासबोधात समर्थ म्हणतात -
अती सर्वत्र वर्जावे। प्रसंग पाहोनी चालावे।
हटनिग्रही न पडावे। विवेकी पुरुषे॥



देहधारणेसाठी प्रमाणात विषयसेवन शास्त्राला देखील मान्य आहे. आपले सण आणि उत्सव आपल्याला मनोरंजन, करमणूक, गोड-धोड खाण्याच्या संधी उपलब्ध करून देत असतात. म्हणजे योग्य त्या विषयसेवनाची ~~शास्त्र~~ व्यवस्था शास्त्रात आहे. मात्र विषयसेवनाचा जे अतिरेक करतात त्यांना समर्थ मूढ म्हणतात. मूढ म्हणजे मूर्ख नव्हे. ज्याला स्वतःचे हित समजत नाही आणि कोणी हिताचे सांगितले तर ते ऐकून घेण्याची मनःस्थिती नाही अशा माणसाला मूढ म्हटले आहे. असा माणूस दृढबुद्धी असत नाही. त्याला जर कोणी विपरीत सल्ला दिला तर तो लगेच पटतो. इतरांच्या बोलण्याने वहावत जातो. इंद्रियसुख आणि संसार ज्याला खरा वाटतो त्याला समर्थ मूढ म्हणतात.

© www.madhaveeraghuveer.com

ज्याला काही समजत नाही तो मूढ आणि आपल्याला काही समजत नाही हे ज्याला समजत नाही तो अतिमूढ. अज्ञान म्हणजे मूढता नव्हे. कारण अज्ञान्यामध्ये ज्ञानाचा अभाव असतो हे खरे पण कोणी त्याच्या कल्याणाचे काही सांगितले तर ते समजून घेण्याची, निदान ऐकण्याची, कळण्याची पात्रता असू शकते. बुद्धि मनावर काही प्रमाणात नियंत्रण ठेवू शकते, श्रेय मार्गाकडे वळवू शकते. पण त्या बुद्धीलाच जर चांगले काय हे कळून घेण्याची इच्छा नसेल तर चौखूर उधळलेल्या घोड्यासारखी गत होते.

ज्याच्या अंतःकरणात विषयोपभोगाची अत्यंत आसक्ती असते, त्याच्या मनात रामाला स्थान नाही. आवश्यकता स्वाभाविक गोष्ट आहे पण चैन कृत्रिमच आहे, उपरी आहे. काम हे अतिक्रमणाचेच रूप आहे. त्याची मर्यादा संपली की अतियोग होतो. विवेकभ्रष्टता वाढते. काम पूर्ण झाला की लोभ वाढत जातो. दुर्योधन, औरंगजेब, रावण हे अतिलोभाचेच बळी आहेत.

दीन स्वादिष्ट

अति दानात् बलिर्बद्धः अतिमानात् सुयोधनः।
अति लौल्यात् दशाननो अति सर्वत्र वर्जयेत्॥

असे लोक स्वतःबरोबर समाजाचाही नाश करवतात.

यासाठी पचेल तेवढेच खावे, सोसेल तेवढेच भोगावे. पण माणसाला हे वेळेवर समजत नाही, त्यातून तो स्वैराचारी बनतो. इंद्रियांना रुचेल ते द्यावे की पचेल ते द्यावे? व्यसनाधीन मनुष्य कधीही ताठ मानेने जगू शकत नाही. कुणालाही विकला जावा अशी त्याची दयनीय अवस्था होते. त्याची शरीर-मन-बुद्धीची कार्यक्षमता संपुष्टात येते. आणि मन केविलवाणे, दीनवाणे जीवन वाट्याला येते. ही दीनता म्हणजे जिवंतपणी भोगावा लागणारा नरकवासच आहे.

Success is prosperity without loosing your peace of mind.

Date 29.3.2013
Page 111

ताठ मानेने जगता यायला हवे.

नको दैन्यवाणे जिणे भक्तिऊणे।
अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणे।
धरी रे मना आदरे प्रीति रामी।
नको वासना हेमधामी विरामी॥ ६७॥

सुखसागरातील शिपळभर सुखही मिळत नाही

<u>अर्थ</u>- भक्तिहीन जीवन म्हणजे हीन जीवन होय. अति अज्ञानी माणसाला नेहमी पुष्कळ दुःख भोगावे लागते. म्हणून हे मना, भगवंतावर मोठ्या आदराने प्रेम करायला शिकावे. भगवंताच्या प्रेमाशिवाय असलेल्या ऐश्वर्याची वासना धरू नकोस.

<u>स्पष्टीकरण</u> - मानवीजीवनातील परमोच्च मूल्य म्हणजे भगवंताला सर्वोत्तम मानणे. ज्याच्या जीवनात भगवंत नाही ते जीवन इतर दृष्टींनी कितीही चांगले असले तरी ते उत्तम जीवन नव्हे. भगवंत विहीन जीवनात दुःखाचे प्रमाण अधिक असते. म्हणून शहाण्या माणसाने नेहमी भगवंताच्या प्रेमाचा अभ्यास करावा. ऐश्वर्य मागावे पण ते भगवंताला जोडून मागावे. अशा ऐश्वर्याचे दुष्परिणाम भोगावे लागत नाहीत.

माणसे संसार कोडगेपणाने करतात. पण देवाची उपासना करताना त्यांना लाज वाटते. खरे तर विषयांच्या आधीन झाल्याने दुःखाचा गुणाकार होतो. ज्याच्या जीवनात भक्ती नाही. रामाविषयी प्रेम नाही असा मनुष्य वासनातृप्तीसाठी सर्वत्र हात पसरतो. तोंड वेंगाडतो. रावण, कंस, कौरव यांच्यापाशी संपत्ती असून, सत्ता असून त्यांच्या जीवनात वासनेचे तांडव असल्याने त्यांचा विनाश झाला.

सोन्याच्या घरात राहणाऱ्यांकडे रामोपासना घडत नसेल तर व्यर्थ आहे. सोने नष्ट होणारे आहे. रामाचे प्रेम चिरंतन आणि शाश्वत आहे. म्हणून तू रामाबद्दल आदरपूर्वक प्रीति बाळग असे समर्थ सांगतात.

गाडी विकत घेता येते सोपं नाही

श्रीमंतीमुळे सुखसमाधान* मिळत नाही. केवळ साधने प्राप्त होऊ शकतात. आनंद, प्रसन्नता यांचा लाभ होत नाही. संतांकडे मात्र याची उणीव नसते. शरीराला शिणवू नये, व्यर्थ पीडा देऊ नये हे जरी खर असल तरी शरीर राबवले नाही तर ते कार्यक्षम रहात नाही हेही तितकेच खरे आहे. शरीराची कार्यक्षमता उणावली की ऐश्वर्याचे सुख भोगण्याचे त्राणही शरीरात उरत नाही. हे दुबळेपण येऊ नये म्हणून समर्थ म्हणतात की विरामी वासना नसावी.

पतिव्रता दारिद्र्यातही समाधानी असते
विलासिनी ऐश्वर्यातही असमाधानी असते

© www.madhaveeraghuveer.com

नव्हे सार संसार हा घोर आहे।
मना सज्जना सत्य शोधूनि पाहे।
जनीं वीष खाता पुढे सूख कैचें?
करी रे मना ध्यान या राघवाचे॥६६॥

अर्थ- मना, हा संसार असार आहे, अनित्य आहे, तो मोठा भयानक आहे. तू स्वत: विचार करुन संसाराचा स्वभाव शोधून पहा. एखाद्याने विष खाल्ले तर त्यास नंतर सुख लाभेल का? म्हणून तू भगवंताचे चिंतन कर.

स्पष्टीकरण- आपल्याला संसार हे सर्वस्व वाटते. खरा तर तो असुख आहे, तरीही तो सुखमय वाटतो. न समजता एखाद्याने विष घेतले तरी ते परिणाम केल्याशिवाय रहात नाही. तसेच संसार सुखमय समजून केला तरी तो भयप्रद आहे. म्हणून विचार करुन संसाराचा स्वभाव समजून घ्यावा. भगवंताच्या सतत चिंतनाने संसाराचे भय बाधणार नाही.

नेटका प्रपंच हा पूर्वपक्ष असून परमार्थ विवेक हा सिद्धांत आहे. समर्थ प्रपंच परमार्थाचा समन्वय सांगतात त्यांच्यामते प्रपंच नेटका करायचा तो टिकवा होण्यासाठी, वासनातृप्तीसाठी नाही. प्रपंच हा ईश्वरप्राप्तीला पूरक ठरावा. संसार हा घोर आहे. जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्। यामध्ये हेच सांगितले आहे. साधकाने संसार सोडून द्यायचा नाही तर त्यातील आसक्तीचा त्याग करायचा आहे. सत्याचा शोध घ्यायचा आहे. सत्याचा शोध न घेता या संसारात रमणे म्हणजे विष खाणेच आहे. ही क्रिया अत्महत्याच आहे. निदान संसाराची आसक्ती संपावी यासाठी दोन मार्ग आहेत. १. उठोनि वाटेसि लागावे दिगंतराप्रती। किंवा २. हळूहळू सोडवावी मिठी प्रपंचाची. ज्याचे वैराग्य पूर्ण पिकले आहे, त्याने पहिल्या मार्गाने जावे. आणि ज्याचे वैराग्य कच्चे आहे त्याने दुसऱ्या मार्गाचा अवलंब करावा. माणसाला कायमचा उपाय नको असतो. तात्पुरती डागडुजी हवी असते. मुक्तीसाठी राघवाचे ध्यान करावे.

श्रीरामचंद्र निर्विषय आहेत. विषयात अडकलेले मन रामचंद्राच्या रुपावर स्थिर करायचे. त्याच्या गुणांचे चिंतन करायचे. यालाच समर्थ सगुण ध्यान म्हणतात. ध्यान म्हणजे

ज्याचे ऐहिक धड नाही । त्याचे परत्र पुसशी काई ।



लक्ष देणे. प्रपंचातील लक्ष काढायचे आणि ते परमेश्वराकडे वळवायचे. ध्यानाच्या अभ्यास करताना काही बंधने पाळावी लागतील.

समर्थ हे प्रवृत्तिपर विचारांचे, संसाराचा पुरस्कार करणारे, प्रपंचविज्ञान आग्रहाने मांडणारे संत आहेत. ते नेटका प्रपंच सांगतात.

ज्याचे ऐहिक धड नाही । त्याचे परत्र पुसशी काई ॥

ज्याला संसार चांगला करता येत नाही त्याला परमार्थही साधत नाही. नपुंसकाला कोणी नैष्ठिक ब्रह्मचारी मानत नाही. परमार्थासाठी चांगली बुद्धी, प्रयत्नशीलता, धैर्य, कार्यक्षमता, कौशल्य, दृढनिश्चय, शरीर-स्वास्थ्य या सर्वांचीच आवश्यकता असते. दुबळेपणा वैराग्याच्या नावावर खपवू नये. प्रपंच नेटका केला म्हणजे त्यातील आसक्ती उणावते.

प्रपंच मुळीच नासका । म्हणोनि करावा नेटका ।
नेटका करितां फिका । होत जातो ॥

संसार हा घोर असला तरी टाकता येत नाही. संसार असार आहे हे सत्य आहे पण ते तू शोधून पहा. संसाराची असारता केव्हा ना केव्हा तरी माणसाच्या अनुभवास येते. असे कसोटीचे प्रसंग संसारात अनेकदा येतात पण तरीसुद्धा अशा अनुभवातून माणूस फारसे काही शिकत नाही. आणि संसारात गुरफटत रहातो. याला समर्थांनी विषाचे उदाहरण दिले आहे. जर विष खाता पुढे सुख कैचे? असा प्रश्न ते विचारतात.

अर्थात द्रव्य म्हणून कोणतेही विष वर्ज्य नाही. वैद्याच्या हातात तर त्यातील काही अमृताचे काम करतात. पण तरी विष विषच आहे. संसाराचे स्वरूपही या विषासारखेच आहे. याचे व्यसन लागू शकते. संसाराच्या आसक्तीचे तसेच आहे. त्यातून दुःख दैन्यच वाट्याला येते. म्हणून संसारात कर्तव्यभावनेने रहावे, आसक्तीने राहू नये. धर्मराजांच्या प्रश्नाला नारद उत्तर देतात.

मातरः पितरः पुत्राः बान्धवाः सुहृदश्च ये ।
यत् कुर्वन्ति वदिष्यन्ति चानुमोदेत निर्ममः । निर्ममः ।

घरातील वडीलधारी माणसे, मुले, बायको, इष्टमित्र, नातेवाईक जे जे करतील, जसे वागतील त्या सर्वांना ठीक आहे असे म्हणावे. मात्र हे म्हणताना निर्मम भावनेने म्हणावे. वैतागाने म्हणू नये. क्वचित आपला निषेध नोंदवावा पण आपल्याच मताचा आग्रह धरू नये.

© www.madhaveeraghuveer.com

पद्मासन, सहजासन, स्वस्तिकासन, सिद्धासन

Date 31.8.2013

संसारातील आसक्ती सुटणे महत्त्वाचे. बाह्यस्वरूपातील संसार कधी सुटतही नाही आणि सोडायचाही नसतो. ही आसक्ती सुटली की परमार्थाची जवळीक घडते. त्यासाठी एक श्रेष्ठ साधन - ध्यान - याविषयी समर्थ सांगतात.

ईश्वराचे ध्यान हा सर्व प्रकारच्या बाधक आसक्तीवरचा एक चांगला उपाय आहे. ध्यानावस्था ही समाधीच्या अलीकडची अवस्था आहे. ध्यानासाठी माणसाने रोज थोडा तरी वेळ काढला पाहिजे. तो शक्यतो ठराविक असावा. स्थानही समतल, स्वच्छ, निवांत आणि पवित्र असावे. वापरावयाचे आसन स्वतंत्र असावे, स्वच्छ असावे. दर्भाची चटई, मृगाजिन व त्यावर धूतवस्त्र असा क्रम असावा. लोकरीचे वस्त्र, त्यातही पांढरी घोंगडी उत्तम. या आसनावर पद्मासन, सिद्धासन, स्वस्तिकासन किंवा सहजासन घालून बसावे. पाठीचा कणा सरळ स्थितीत असावा. खांदे सरळ रेषेत असावे. दृष्टीसमोर आपल्या इष्टदेवतेचे, संतांचे, गुरुचे चित्र असावे. किंवा ॐ, श्री, स्वस्तिक असे प्रतीक असावे. तुपाच्या निरंजनाचा मंद प्रकाश असावा.

त्यानंतर आपल्या मनात इष्टदेवतेचे स्वरूप व नाम याशिवाय दुसरे काही येणार नाही याचा अभ्यास करावा. त्याच जोडीला आहार विहार साधे आणि सात्त्विक असले म्हणजे ध्यानातील एकाग्रतेचा लाभ हा कमी श्रमात अधिक मिळत जाईल. परंतु कोणतीही गोष्ट एकदम साधत नाही. ध्यानात घाई किंवा जबरदस्ती चालत नाही (तुका म्हणे येथे। नाही चालत तातडी।) या वचनाप्रमाणे धीर न सोडता सातत्य सांभाळावे. त्यातून आसक्ती कमी होऊन प्रसन्नता वाढत जाते.

© www.madhaveeraghuveer.com

६७ते ७६ या श्लोकांच्या चौथा चरण समान आहे

घनश्याम हा राम ~~लाव~~ लावण्यरूपी।
महा धीर गंभीर पूर्णप्रतापी।
करी संकटी सेवकांचा कुडावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥६७॥

अर्थ - रंगाने सावळा असलेला भगवंत म्हणजे मूर्तिमंत सौंदर्य आहे. तसाच तो अतिशय धैर्यवान व अगाध आहे. त्याच्याएवढा पराक्रमी कोणी नाही. आपल्या सेवकावर संकट आले असता तो सेवकाचे रक्षण करतो. अशा भगवंताचे पहाटे चिंतन करावे.

स्पष्टीकरण - आपल्याला दृश्याचे चिंतन करायची सवय असते. तिची दिशा बदलून भगवंताच्या सगुणसुंदर रूपाचे चिंतन करायला शिकावे. त्याच्या गुणांचे, लीलांचे चिंतन करावे. रात्री स्वस्थ झोप लागून पहाटे जाग आली म्हणजे जागेपणचे मन शांत असते. त्यावेळी केलेले चिंतन-मनन आतपर्यंत रुजते. आणि हीच खरे तर अनुसंधानाची पहिली पायरी आहे.

सकाळी उठल्यावर वृत्तपत्रातील मजकुराने विषयचिंतनाला मोठे खाद्य मिळते. त्याची जागा रामचिंतनाने घ्यावी आणि प्रसन्नतेने दिवसाला सुरुवात करावी. त्यातून एक प्रकारची शुद्धता शांतता आणि मनाला स्थिरता प्राप्त होते. घनश्याम सावळा आहे. सावळा रंग संग्राहकतेचे प्रतीक आहे. तो अनेक गुणांचा संग्राहक आहे. मेघाप्रमाणे उदार आणि जलमय आहे. ईश्वराकडे कोरडेपणा नाही. तो लावण्यरूप आहे. (सौंदर्यापेक्षा गहन शब्द) वल्लभाचार्य म्हणतात - मधुराधिपतेरखिलं मधुरम्। तर तुकाराम महाराज म्हणतात - गोड तुझे रूप गोड तुझे नाम।

दुसऱ्या चरणातील महा हा शब्द तिन्ही विशेषणांना वापरता येईल. धीर, गंभीर, पूर्णप्रतापी. धैर्य हे सत्वगुणाचे लक्षण आहे. राज्याभिषेकाच्या दिवशीचे वनवासाची आज्ञा, रावणाने केलेले सीतेचे अपहरण अशा कोणत्याही वेळी धीर खचला नाही. साधक प्रसन्न आणि आनंदी वृत्तीचा असावा पण तरीही गंभीर असावा. त्यात उथळपणा नसावा. वरवरच्या चिखलपणाला भुलणारा नसावा. समुद्र गंभीर असतो. त्याला विस्तार आणि खोली दोन्ही आहे.

पराक्रम असावा तो भक्तांच्या रक्षणासाठी. प्रभू रामचंद्राने आपल्या भक्तांची संकटातून सुटका केली. त्यासाठी

© www.madhaveeragulveer.com

साधकाची भूमिका सेवकाची असावी. भगवंत रक्षण करणार याचा अर्थ भक्ताने निष्क्रिय असावे असे नाही. भगवंत आपल्याबरोबर आहे अशी श्रद्धा ठेवून आपले कर्तव्यकर्म करीत रहावे. दास्यभक्तीतून भगवंताशी जवळीक निर्माण होते. भगवंत वरील त्या अनाधिकारी भक्तांचे रक्षण करत नाही.

मागील श्लोकात राघवाचे ध्यान करायला सांगितले. या श्लोकात रामाचे चिंतन हा वरच्या पायरीवरचा शब्द वापरतात. मनुष्याने स्वतःच्या उद्धारासाठी नामस्मरण, ध्यान व चिंतन करावे. त्यातून प्रपंचातील कर्मे चांगली होतात. त्यातील अधर्म उणावतो. अंतःकरण शुद्ध होते. आसक्ती सुटत जाते.

दैव आणि प्रयत्न दोन्ही परस्परांना पूरक आहेत. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी । या खुळेपणाने कोणी आळशी व निष्क्रिय राहू नये. कारण प्रयत्न आपल्या हातात आहेत पण दैवाची जाणीव ठेवली पाहिजे. प्रयत्नवादाला ईश्वरनिष्ठेची साथ असायला हवी. हे ईश्वरचिंतन केव्हा करायचे?

प्रभातकाळी झोपेतून जागे झाल्यावर, स्नानानंतर, भोजन करण्यापूर्वी, दिवस मावळताना, रात्री झोपण्यापूर्वी देवाचे स्मरण प्रेमाने करावे. त्याचे नाव घ्यावे. प्रार्थना करावी, स्तोत्रे म्हणावी. ध्यानाचा विषय सुंदर असावा. त्याने एकाग्रता साधते.

धीर शब्दामध्ये बुद्धीने पारखून मग दृढ रहावे असे सूचित केले आहे. गंभीर नसणारा माणूस चंचल असू शकतो. उंच इमारत बांधायची असेल तर पाया खोल असावा. झाडाची मुळे खोलवर जाण्यावर झाडाचा विस्तार व स्थैर्य अवलंबून असते. गांभीर्य हा गुण विपुलतेचा, व्यापकतेचा द्योतक आहे. त्यातून एक प्रकारची परिपूर्णता सूचक आहे.

ईश्वर आपल्या भक्तांचे रक्षण करतो. अनन्यास रक्षितसे चापपाणी । आपल्या अनन्यतेत उणीव असल्याने आपला विश्वास डळमळीत होतो. ईश्वर समर्थ आहे तसा तो सर्वज्ञही आहे. तो आमच्या इच्छेप्रमाणे वागणार नाही. सद्गुरूंच्या संगतीतून, परमार्थाच्या निष्ठेतून सद्बुद्धी लाभते आणि ईश्वरचिंतनाने ती दृढावते.

© www.madhaveeragnuveer.com

बळे आगळा राम कोदंडधारी।
महाकाळ विक्राळ तोही थरारी।
पुढे मानवा किंकरा कोण केवा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥ ६८॥

<u>अर्थ</u> - धनुष्य हाती बाळगणारा भगवंत सामर्थ्याने सर्वाहून श्रेष्ठ आहे. साऱ्या विश्वाला गिळून टाकणाऱ्या प्रलयकाळास सगळेजण घाबरतात. पण तोही भगवंतासमोर भयाने थरथर कापतो. मग यःकश्चित माणसाचे भगवंतासमोर महत्त्व कितीसे असणार! अशा त्या भगवंताचे पहाटेच्या वेळी चिंतन करावे.

<u>स्पष्टीकरण</u> - श्री समर्थांचा कोदंडधारी राम म्हणजे सच्चिदानंदघन-स्वरूप ईश्वरच होय. त्याचे सामर्थ्य अनंत व अपार आहे. हे अवाढव्य विश्व मोडून टाकण्याची अपार शक्ती असणारा महाकाळ सुद्धा भगवंतापुढे क्षुद्र पदार्थ ठरतो तर माणसाची शक्ती ती केवढी! तिचा या भगवंतापुढे काय पाड लागणार? तेव्हा माणसाने त्याच्या पायी लीन व्हावे हे उत्तम।

२८ व्या श्लोकात असाच कोदंडधारीचा निर्देश केला आहे. तिथे त्याला दीनानाथ तर इथे बळे आगळा राम असे म्हटले आहे. त्याला प्रत्यक्ष यमराज घाबरतात, तिथे सामान्यांची काय कथा? आपण जर भगवंताची उपासना सोडून दिली तर भगवंताचे काहीच नुकसान नाही. आजारी माणसाने औषधे घेतली नाहीत तर वैद्याचे काहीच नुकसान नसते. भगवंताच्या तुलनेत माणूस हा यःकश्चित प्राणी आहे. याचे भान असावे.

ईश्वर समर्थ आहे. तो शस्त्रधारी आहे. विष्णुसहस्रनामाच्या शेवटच्या श्लोकातील शेवटचा शब्द 'सर्वप्रहरणायुधः' असा आहे. हिंदूंची सर्व दैवते शस्त्रधारी आहेत. इतकेच नाही तर सर्वशस्त्रभूषित आहेत (उदा- त्रिशूल) ईश्वराचे सामर्थ्य अलौकिक आहे - बळे आगळा. शस्त्र वापरताना विवेक असावा. भक्ताचे रक्षण करण्यासाठी तो कोदंडधारी झाला आहे. अशा रामाला पाहून महाकाळही भयभीत होतो व थरथर कापू लागतो. कळिकाळालाही ज्याचे भय त्याला आपल्या सेवकाचे रक्षण करणे मुळीच अवघड नाही.

श्रीरामे सुखर सोडविले। श्रीरामे दैत्य संहारिले।
श्रीरामे महापापी तोचि दंडिले। सामोरे रणांगणी॥
राक्षसांचे खंडण, दंडण, मंडण केले--

© www.madhaveeragiveer.com

कृपाळुपणे अल्पधारिष्ट्य पाहणार राम
सुख आनंद कैवल्य देणारा आहे
निर्भय करणारा आहे। त्रिभुवनात मी पाहिला आहे.

सुखानंदकारी निवारी भयाते।
जगी भक्तिभावे भजावे तयाते।
विवेके त्यजावा अनाचार हेवा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥ ६॥

अर्थ - भगवंत परमानंद देतो. तो भय निवारण करतो. माणसाने जीवनामध्ये अत्यंत प्रेमाने व आस्तिक्यभावाने भगवंताचा आश्रय करावा. विवेकाचा उपयोग करून माणसाने अनीतीचे आचरण सोडावे. कोणाचा द्वेष मत्सर करू नये. अशा त्या भगवंताचे पहाटेच्या समयी चिंतन करावे.

स्पष्टीकरण - 'मी भगवंताचा आहे' ही जाणीव प्रपंच्याच्या भीती-मधून होते किंवा भगवंतावरील प्रेमातून होते. प्रेमामधील उगम हा आनंददायक असल्याने तिथे भयाची वार्ता उरत नाही. त्यासाठी अंतःकरण स्वच्छ, निर्मळ असावे लागते. द्वेष वा मत्सर आनंदाचा उच्छेद करतात. दोघां त्यांना नष्ट करण्यासाठी विवेकासारखे साधन नाही. विवेकाने निर्मत्सर बनलेल्या अंतःकरणात भगवंताच्या अस्तित्वनिष्ठेचा वेल फोफावून गगनापर्यंत पोहोचतो.

आयुष्यभर मनुष्याला सुखाची आणि आनंदाची ओढ असते. फक्त त्याचा शोध चुकीच्या जागी सुरु असतो. तो संसारातील विषयांमध्ये सुख शोधत रहातो. आणि संसारातील सारी सुखे दुःखपर्यवसायी आहेत. त्या सुखाच्या प्राप्तीत अनिश्चितता असते. या अनिश्चिततेतून भय उत्पन्न होते. आजाराचे भय, दारिद्र्य, अपकीर्ति, वार्धक्य, नातेसंबंध यांचे भय असते आणि मृत्यूचे भय तर असतेच असते. अनाचार आणि हेवा हे साधनमार्गातील अडथळे आहेत. त्यातून दुःख वाढते. साधकाने अजातशत्रू असावे. साधकाने सदैव मन मोकळे ठेवावे. एकीकडे नामस्मरण आणि दुसरीकडे अनाचार आणि हेवा या परस्परविरोधी कर्माने शक्तीचा व्यर्थ अपव्यय होतो. त्यातच आयुष्य निघून जाते.

माणसाने विवेकाने वागावे. आपले वर्तन अधिक सदाचारी होत जाईल. मन शुद्ध, निर्मत्सर राहील असा प्रयत्न करावा.

कबीर - नाम बिना बेकाम है छप्पन कोटि बिलास।
का इन्द्रासन बैठिबो का बैकुण्ठ निवास॥

तुलसीदास - भक्ति बिना सब सुख ऐसे। लवण बिना बहु व्यंजन जैसे।

© www.madhaveraghuveer.com

Vaccine

सदा रामनामे वदा पूर्णकामे।
कदा बाधिजेना पदा नित्यनेमे।
मदालस्य हा सर्व सोडोनि द्यावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥७॥

अर्थ – भगवंताचे नाम सतत अगदी मनापासून घ्यावे. अखंड चालणाऱ्या नियमाने जो नाम घेतो, त्याला संकटे त्रास देत नाहीत. पण माणसाने अहंकार व आळस दोन्हीचा संपूर्ण त्याग करावा.

स्पष्टीकरण – पहाटेच्या वेळी भगवंताचे चिंतन करावे हे खरे. पण दिवसभर भगवंताचे नाम घ्यावे. त्याच्या अनुसंधानात रहावे. आणि ते नाम सुद्धा मनापासून घ्यावे. त्याचाही अभ्यास करावा लागतो. अध्यात्मात सकामतेची सवय मोडावीच लागते. नामासाठी नाम घ्यायचे, भगवंतासाठी नाम घ्यायचे. काही मिळावे म्हणून नाम घ्यायचे नाही तर नाम घेत रहावे असे वाटणे हेच नाम घेण्याचे फळ आहे. नाम घेण्याची वासना उरून इतर सर्व वासना विराम पावणे म्हणजे पूर्णकाम.

असा पूर्णकाम भक्त जेव्हा नित्यनेमाने नाम घेतो तेव्हा संकटे आली तरी त्याचे नाम खंडित होत नाही. कारण संकटाची गती देहापर्यंत असते. त्यांना आतमध्ये शिरकाव होत नाही. हाच नामाचा खरा चमत्कार आहे. मनापासून नाम घेण्याच्या आड दोन दोष येतात. मद म्हणजे कर्तेपणाचा अभिमान आणि आळशीपणा किंवा चुकारपणा. माणसे पूजाअर्चा करतात, पारायणे करतात, तीर्थयात्रा करतात पण बसल्या ठिकाणी मनापासून नाम घेण्याचा कंटाळा करतात. आणि आजचे काम आणि आजचे नाम उद्यावर ढकलतात.

भगवंताला निष्काम भक्त जास्त आवडतो पण सकाम भक्तही त्याज्य नाही. उदा: सर्व [illegible] मातंगु। त्यामुळे मनातील इच्छा पूर्ण होण्यासाठी जरी रामनाम घेतले तरी ते त्याच्यापर्यंत पोहोचते. आणि प्रारंभी श्रद्धा वाढण्यासाठी सकामता ठीक आहे. पण सकामतेत विषय प्रधान असतो आणि भगवंत गौण असतो. पण केव्हातरी विषयवासना गळून पडायलाच हव्यात. भगवंताच्या प्रेमाखेरीज काही नको अशी भावना निर्माण व्हावी. इच्छापूर्ती हा नामाचा परिणाम असावा,

© www.madhaveeraghuveer.com

हेतू नसावा. भगवंताखेरीज आता मला काही नको असे वाटले.
उपासनेत नित्यनेमाला फार महत्त्व आहे. बाकी सगळ्या गोष्टी आपण नेमाने करतो. खंड पडतो तो नेमका उपासनेत. नोकरीवाचून अडते, जेवणावाचून अडते तसे व तितके भगवंतावाचून अडत नाही. मग तो बाजूला टाकला जातो. नित्यनेमात जर खंड पडला तर साधनेची खोली प्राप्त होत नाही. गायक गाण्याचा रियाज करतो. खेळाडू खेळाचा सराव करतो मग भक्तिमार्गात नित्यनेम नको का?
नित्यनेमाने साधन चालू ठेवले म्हणजे संकटे येणारच नाहीत असे नाही तर ती बाधणार नाहीत. उपासनेमुळे संकट हे संकट वाटत नाही. संकटाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलतो. स्थिरचित्त राहण्याचा अभ्यास वाढतो.
या श्लोकात मद आणि आळस टाकून द्यायला सांगितले आहे. खरे तर संकटे ही माणसाचा मद जिरवण्यासाठीच असतात. संकटसमयीच्या अगतिकतेने मदाचा पारा खाली येतो. इतका पराधीन असूनसुद्धा त्याला किती प्रकारची मस्ती असते. पैशाची, सत्तेची, सौंदर्याची, यशाची, तारुण्याची. कर्मकांडी माणसाला आपल्या कर्मकांडाचाही मद असतो. संकटामध्ये आळस झटकून कामाला लागावे लागते. पुराणामध्ये गर्वहरणाच्या अनेक कथा आहेत. एखाद्याला मद निर्माण झाला की त्याचा जिरलाच म्हणून समजा.
आपत्ती येणे न येणे दैवाधीन आहे पण ती न बाधणे हे माणसाच्या हातात आहे. त्याने सद्‌गुण अंगी बाणवले तर स्थितप्रज्ञाच्या पायरीपर्यंत तो पोहोचू शकेल. आणि आपत्ती न बाधण्याची म्हणजेच संकटातही प्रसन्न राहण्याची सिद्धी प्राप्त होऊ शकते.

चालता बोलता धंदा करिता। खाता जेवता सुखी होता।
नाना उपभोग भोगिता। नाम विसरो नये॥

© www.madhaveeragnuveer.com

जयाचेनि नामे महादोष जाती।
जयाचेनि नामे गती पाविजेती।
जयाचेनि नामे घडे पुण्यठेवा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥ ७९॥

अर्थ - भगवंताच्या नामस्मरणाने माणसाचे मोठमोठे दोष जातात. त्याला उत्तम अवस्था प्राप्त होते. आणि त्याच्या पुण्याचा संचय होतो. अशा भगवंताचे पहाटे चिंतन करावे.

स्पष्टीकरण - भगवंताचे दर्शन होण्यासाठी माणसाचे अंतःकरण अतिशय पवित्र व्हावे लागते. खोटे बोलणे, चोरी करणे, हिंसा करणे, दारु पिणे आणि व्यभिचार करणे या पाच दोषांनी अंतःकरण अपवित्र बनते. म्हणून त्यांना महादोष म्हणतात. या दोषांच्या आचरणाने माणूस स्वतः तर भ्रष्ट होतोच पण समाजजीवनदेखील भ्रष्ट करतो. भगवंताच्या नामामध्ये माणसाचे अंतरंग आमूलाग्र बदलण्याचे सामर्थ्य आहे. नामस्मरणाने पुण्याचा संचय होतो. त्याला उत्तम गती मिळते. अनेक जन्मांच्या पुण्याच्या संचयाने जीवाच्या वासना शुद्ध होत जातात. हीन वासना तर नाशच पावतात. भगवंताबद्दलची वासना नेवढी शिल्लक रहाते.

हरि उच्चारणी अनंत पापराशी। जातील लयासी क्षणमात्रे।
तृण अग्निमेळे समरस झाले। तैसे नामे केले जपता हरि।

नामाने दोष नाहीसे होण्याची क्रिया किती वेगाने होते ते सांगण्यासाठी माऊलीने गवत व अग्नी यांचा दृष्टांत दिला आहे. समर्थसुद्धा म्हणतात - महादोषांचे गिरिवर। रामनामे नासती॥ गोंदवलेकर महाराज म्हणतात - नामस्मरणाने साधक अंतर्मुख होतो व त्याला त्याचे दोष दिसायला लागतात. प्रापंचिक इतरांचे दोष पहाण्यात वाकबगार असतात. परंतु साधकाला स्वतःचे दोष दिसायला लागतात. आणि हळूहळू हे दोष काढून टाकण्याची शक्तीही नामातूनच प्राप्त होते. त्यातून मन शुद्ध व शांत होते. विषयचिंतनाची जागा रामचिंतनाने घेतल्यामुळे आपोआप दोष नाहीसे होतात. नामाने पापी मनुष्यसुद्धा साधुपदी पोहोचतो. वाल्याचा वाल्मीकी होतो. नामस्मरणाने गती प्राप्त होणे याचे दोन अर्थ आहेत - १. साधकाची प्रगती सुरु होते. मार्ग स्पष्ट दिसू लागल्याने वाटचाल जोराने होते. २. मृत्यूनंतर साधकाला

© www.madhaveeraghuveer.com

जब मुश्किलों हो सामना। तब तूही हमें थामना।
वो बुराई करे हम भलाई करे। नहीं बदले की हो कामना।
ताकि हँसते हुए निकले दम।

सद्गती प्राप्त होते. म्हणजे साधक पूर्ण निर्वासन झाला असल्यास मुक्ती मिळते किंवा थोड्याफार वासना शिल्लक राहिल्यास पुढचा जन्म पवित्र आणि चांगल्या कुळात मिळतो आणि बालपणापासूनच साधनेची वाटचाल सुरु होते.
सर्वच धर्मांमध्ये मृत्युसमयी भगवंताच्या नामोच्चाराला महत्व दिले आहे. शेवटचा दिस गोड व्हावा - तुकाराम महाराज।

इतना तो करना स्वामी जब प्राण तनसे निकले।
गोविंद नाम लेकर फिर प्राण तनसे निकले।
तेरा नाम निकले मुख से मेरा प्राण निकले सुखसे।
बच जाऊँ घोर दुखसे जब प्राण तनसे निकले।

बँकेत ठेवलेली ठेव जशी अडीअडचणीला उपयोगी पडते तशीच भगवंताच्या नामस्मरणाची पुण्याई संरक्षक कवच बनून साधकाला संकटातून बाहेर काढते. एखाद्या अपघातातून आपण नेमके वाचणे, दुर्धर आजार लवकर बरा होणे, मुली चांगल्या घरात दिल्या जाणे, सात्विक सून लाभणे या गोष्टी योगायोगाच्या नाहीत. तर नामाच्या पुण्याईने घडून येतात.
वर्तमानपत्राच्या माध्यमातून मानसिक अस्वस्थता येते. अपघात, मानगडी, घोटाळे, बलात्कार, चोरी, हिंसा यामुळे मने भ्रांत होतात. शांतता आणि समाधान लोप पावते. यावर उत्तम उपाय म्हणजे नामस्मरण। त्याने महादोष तर जातातच पण प्रगतीचा, उद्धाराचा मार्ग दिसू शकतो. वाईट काय आहे हे कळते की वाईटाकडे जाण्याची प्रवृत्ती कमी होत जाते. अन्नात प्राणघातक विष मिसळले आहे हे कळल्यावर जसे शहाणा माणूस ते अन्न सेवन करणार नाही. तसे दुर्वर्तनाचे परिणाम समजल्यावर ते हातून घडणार नाही. उलट चांगल्या वाईटाचा विवेक वाढतो आणि सदाचरणास बळ लाभते.

जीवनाच्या बँकेत पुण्याचा Balance वाढवत नेला तर आनंदाचे चेक Bounce होणार नाहीत।

© www.madhaveeraghuveer.com

न बेचे कदा ग्रंथीचे अर्थ काही।
मुखे नाम उच्चारिता कष्ट नाही।
महा घोर संसार शत्रु जिणावा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७२॥

अर्थ - भगवंताचे नामस्मरण करण्यास पदरचा पैसा खर्च करावा लागत नाही. मुखाने नाम घेण्यास शरीराला कष्ट पडत नाहित. अशा नामस्मरणाने संसारासारखा भयंकर शत्रु जिंकावा.

स्पष्टीकरण - 'मी देहच आहे' अशी दृढ भावना असल्याने सामान्य माणूस आपल्या देहाला जपतो. आणि देह सुखात ठेवण्यासाठी लागणाऱ्या वस्तु पैशाने उपलब्ध होतात म्हणून पैशाला जपतो. संसारात रमलेल्या माणसाची ही दोन मर्मस्थाने समर्थांनी बरोबर ओळखली. ती नजरेसमोर ठेवून ते सांगतात की भगवंताच्या नामस्मरणासाठी पैसा खर्च करावा लागत नाही किंवा शरिरकष्ट करावे लागत नाही. परंतु याचबरोबर सावधगिरीची सूचना देतात की देह आणि पैसा या दोन्ही गोष्टी केव्हा धोका देतील ते सांगता येत नाही. जीवाला भगवंताचा विसर पाडणारा संसार हा त्याचा मोठा शत्रूच मानला पाहिजे. भगवंताच्या स्मरणामध्येच संसाराचे मरण अनुभवाला येते. संसार जिंकून संसारात राहणाऱ्याला भय कसले?

श्लोकातील पहिल्या चरणाचे दोन अर्थ होतात - ग्रंथिचे म्हणजे पदरचे आणि अर्थ म्हणजे पैसा. याचा अर्थ भगवंताचे नाम घेताना पदरचा पैसा खर्च करावा लागत नाही. दुसऱ्या अर्थानुसार नामसाधना करताना निरनिराळे ग्रंथ वाचून त्याचे अर्थ समजावून घेण्याची गरज नाही. नामसाधनेत वाचनाची गरज नाही. तसेच नामाचा उच्चार करताना कोणतेही कष्ट नाहीत आणि त्यात रामनाम तर अगदी सुलभ आहे. त्यात जोडाक्षर नाही. त्यामुळे जिभेला उच्चाराचे कष्ट नाहीत.

माणसे परमार्थाच्या बाबतीत पैशाचा विचार फार करतात त्याउलट भोगासाठी वाटेल तितका पैसा उधळतात. जी गोष्ट हिताची आहे ती करताना उगीच काटकसर करतात परंतु जी गोष्ट कल्याणाची नाही उलट घातक आहे तिच्यासाठी बेरमाप खर्च करतात. लग्नात बँडसाठी हजारो रुपये

© www.madhavoeraghuveer.com

खर्च करतील पण गुरुजींची दक्षिणा देताना घासाघीस करतील देवासाठी सुपारी, नारळ आरतीचे खण वेगळे असतात. तिथे पैसेकी कुणी डोके वर काढते. मात्र रामनाम इतके सोपे आहे. त्यात कष्टही नाहीत आणि खर्चही नाही.

पण ते इतके सोपे आणि बिनखर्चाचे आहे म्हटल्यावर त्याच्या प्रभावीपणाविषयी शंका येते. ते परिणामकारक आहे की नाही याचा संशय येऊ लागतो त्याचे निरसन करताना समर्थ सांगतात संसारासारखा महाभयंकर शत्रुही नामाने जिंकता येतो. एकदा साधक नामात रंगून गेला की संसारात पूर्वीसारखा रमत नाही. चित्रपट, दूरदर्शन, खेळ, प्रदर्शने, राजकारण, निवडणुका यात त्याला फारसा रस वाटत नाही. संसाराच्या भयानकतेवर नामाच्या प्रभावाने मात करता येते. एका कवितेत समर्थ म्हणतात

तुला सांगतो गूज हे बीज मंत्रु। जेणे नीरसे घोर संसार शत्रु।
नव्हे मिथ्य हे बोलणे सत्य वाचा। जपे अंतरी मंत्र हे राघवाचा॥

रामनाम घेण्याने एक पैसाही खर्च होत नाही उलट भलत्यासलत्या गोष्टी करण्याची इच्छा कमी झाल्याने उधळपट्टीला आळा बसतो. देवाचे नाव घेताना शरीर श्रमवावे लागत नाही. हे विनाकष्टाचे साधन आहे. पण फुकट मिळणारी गोष्ट कमी महत्त्वाची वाटते. पण समर्थ सांगतात हे फार मोलाचे आहे. अत्यंत उपयुक्त आहे. कारण त्याच्या प्रभावामुळे संसारासारखा महाशत्रु सुद्धा जिंकता येतो. संसारात रमलेल्याला तो शत्रु वाटतच नाही. शत्रुचे शत्रुत्व लक्षात न येणे हीच मोठी धोकादायकता आहे. पण शत्रुचे शत्रुत्व लक्षात आले की प्रतिकाराची क्षमता वाढते. सामर्थ्य वाढवता येते. म्हणून रामनामाचे सतत चिंतन करावे.

श्लोक-८३

सुरेंद्र चंद्रशेखरु। अखंड ध्यानसे हरु।
मनासि सांगतो खुणा। श्रीराम राम हे म्हणा।
महेश पार्वतीप्रती। विशेष गूज सांगती।
सलाभ होतसे खुणा। श्रीराम राम हे म्हणा।

देहेदंडणेचे महा दुःख आहे।
महा दुःख ते नाम घेता न राहे।
सदाशिव चिंतीतसे देवदेवा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥५३॥

अर्थ - देहाला कष्ट देण्यामध्ये अतिशय दुःख भोगावे लागते. पण जो भगवंताचे नाम घेतो त्याला दुःख भोगावे लागत नाही. श्री शंकर परमेश्वराचे नाम चिंतन करतो. अशा त्या भगवंताचे पहाटेच्या समयी चिंतन करावे.

स्पष्टीकरण - ईश्वराचे दर्शन होण्यासाठी देहाची आसक्ती सुटावी लागते. आणि ही आसक्ती सुटण्यासाठी देहाला क्लेश देणे हा मार्ग प्राचीन कालापासून चालत आला आहे. उपासतापास, जप, व्रते, अनुष्ठाने, तप यामध्ये देहाला खरोखर मोठे दुःख भोगावे लागते. भगवंताचे नामस्मरण करणाऱ्याला असे कष्ट सोसण्याची गरज नाही. भारतीय संस्कृतीमध्ये श्रीशंकराला तपोमूर्ती मानतात. असा योगीश्वर सदाशिवदेखील भगवंताचे नामस्मरण करतो.

तिन्ही लोक जाळू शके कोप येता।
निवाला हरु तो मुखे नाम घेता।
जपे आदरे पार्वती विश्वमाता।
म्हणोनि म्हणा तेचि हे नाम आता॥५४॥

नामस्मरण हा ॲनेस्थेशिया आहे. नाम अंतःकरणात जितके खोलवर रुजेल तितकी देहबुद्धी कमी होत जाते. आणि देहबुद्धी जेवढी कमी तेवढे देहदुःखाच्या बाबतीत साक्षित्व येते. स्वामी विवेकानंदांचे गुरुबंधू तुरीयानंद यांचे गळू शस्त्रक्रियेने कापायचे होते. तेव्हा ते डॉक्टरांना म्हणाले "तुम्ही मला भूल देऊ नका. मी माझे मन शरीरातून काढून घेतो आणि भगवंतामध्ये स्थिर करतो." परमेश्वराच्या चिंतनाने देह दुःख सहन करण्याची क्षमता येते. हलाहल विषामुळे कंठाचा दाह होत असताना सदाशिव रामनामाचे चिंतन करत राहिले.

इथे समर्थ देवदेवा हा शब्द देवांचा देव या अर्थाने वापरतात. खरोखर इथे प्रभू रामचंद्र हे दाशरथि राम म्हणून नाही तर देवांचे देव- भगवंत आहेत. कारण त्यांनी रावणाच्या बंदिवासातून सर्व देवांची सुटका केली.

© www.madhaveeraghuveer.com

अति नियम करु नये
नियम केल्याविना राहो नये।

उपाधिस विस्तारावे। उपाधिमध्ये न सापडावे॥

सामान्यांसाठी मध्यममार्ग

बहुतांपरी संकटे साधनाची।
व्रते दान उद्यापने ते धनाची।
दिनाचा दयाळू मनी आठवावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥ ७४॥

अर्थ - भगवंताच्या प्राप्तीसाठी साधने करायची म्हटली तर त्यात नाना अडचणी येतात. व्रते, दान, उद्यापने करायची झाली तर त्यासाठी पुष्कळ पैसा लागतो परंतु दीनदयाळ भगवंताला मनाने आठवण्यासाठी यापैकी काहीच लागत नाही.

Balance phrase गीता

स्पष्टीकरण - छांदोग्य उपनिषदात यज्ञ, दान, तप यांना त्रिस्कंध धर्म असे नाव दिलेले आढळते. हे तिन्ही मिळून वैदिक संस्कृतीची जीवनपद्धती बनवली होती. कालांतराने वैदिक संस्कृतीच नष्ट झाली. परंतु त्यातून निरनिराळी व्रते, तपे व्यक्तीगत साधनेसाठी निर्माण झाली. पण त्यांचाही अतिरेक नको. कर्मकांड नको. कारण भगवंताचे दर्शन अखेर आपल्या अंतर्यामीच व्हायला हवे. जो कोणी मनाने दीन होऊन त्याचे स्मरण करतो त्याच्यावर भगवंत कृपेचा पूर लोटतो. शरणवृत्तीने भगवंताचे सतत स्मरण करावे.

स्थ. मनुस्मृति

पंचाग्नी, धूम्रसेवन, पदयात्रा यात देहाला खूप कष्ट आहेत. यजमान बहिर्मुख आणि अहंकारी असला किंवा पुरोहित जर लोभी असेल तर ती उपासना राजसिक/तामसिक होते. त्याशिवाय वाममार्गी शाक्तांचा, कौलांचा व कापालिकांचा महाभयंकर असा वामाचार असतो. आणि त्या पद्धतीचा पुरस्कार करणारे संप्रदायही असतात. या सर्वांचा उल्लेख करताना समर्थ त्यांना नाना संकटांनी भरलेली साधने म्हणतात. चुकीच्या पद्धतीच्या मागे लागून साधक स्वतःचे नुकसानही करून घेतात. हातापायाला कापरे भरणे, वेदना होणे, वेड लागणे, यातून परमार्थमार्ग बाजूला राहून केवळ स्वैर दुर्वर्तनाने जीवन व्यापले जाते. खरा लाभ बाजूला रहातो. आणि असे धोके समोर उभे रहातात. शिवाय व्रते, उद्यापने यासाठी पैसा बराच लागतो. आणि कष्टही खूप असतात. स्वतःला त्याचे पूर्ण ज्ञान नसते. मंत्र येत नाहीत. तंत्र कळत नाही. विश्वास ठेवावा असे पुरोहित मिळतीलच असे नसते.

© www.madhaveeraghuveer.com

धनदक्षिणेसंबंधी असा नियम आहे की त्यासाठी होणारा व्यय हा यजमानाच्या श्रीमंतीला साजेसा असला पाहिजे. दक्षिणा ही इतक्या कामाकरता इतकी अशा स्वरूपाची मजुरी नाही. पण माणसाच्या स्वभावातील काटकसर व भागवाभागवी या धार्मिक स्वरूपाच्या कार्यक्रमावरून कोसळले. आणि हा पैसा सुध्दा न्याय्य मार्गाने मिळवला असेल असे नाही. त्यामुळे त्याचे फळ अपेक्षेप्रमाणे मिळत नाही. म्हणून समर्थ म्हणतात- या भानगडीत पडताच कशाला?

सात्विक मनुष्य नेहमी जप किंवा ध्यान निवडतो. भगवंत हा दीनांविषयी दया बाळगणारा आहे. दीन म्हणजे अकिंचन, दुबळा, असमर्थ. ज्याच्याकडे इच्छा आहे पण अनुकूलता नाही अशा दीन माणसांच्या उपयोगी पडणारे नामासारखे दुसरे साधन नाही.

भगवान दयाळू आहे. माणसातील उणीवांची त्याला जाणीव आहे. त्याच्या अंतःकरणात क्षमा रहाते. तो सांभाळून घेतो. साधकाकडे आपलेपणाने पाहतो. त्याचे औदार्य व्यापक आहे. तेव्हा माणसाने इतर अवघड साधनांच्या मागे न लागता मनाने, असेल तेवढ्या भावाने नामस्मरण करावे. अंतर्मुख व्हावे. कर्मकांडात बहिर्मुखता आहे, उपाधी आहे. नामस्मरण हे उपाधिरहित आहे. जपमाळ सुध्दा नसेल तरी बोटावर किंवा अगदी श्वासावर नाम घेता येते.

नमो आदि ब्रह्मस्वरूपा महेशा।
नमो हेच नारायणा विश्वेशा।
नमो कळलेना नमिता श्रीरामा
नमो मारुती रामदासाभिरामा॥

© www.madhaveeragiriweer.com

Date 2.9.2013

समस्तांमध्ये सार साचार आहे।
कळेना तरी सर्व शोधूनि पाहे।
जिवा संशयो वाउगा तो त्यजावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥१०५॥

अर्थ - खरोखर सर्व साधनांमध्ये नामस्मरण हे उत्कृष्ट साधन आहे. हे जर ध्यानात येत नसेल तर श्रुति, स्मृति, पुराणे आणि संतांचे ग्रंथ नीट अभ्यासावे. नामाबद्दल येणारे निरर्थक विकल्प आपणहून सोडावे.

स्पष्टीकरण - भगवंताच्या नामस्मरणामध्ये पुढील तीन उत्तम लक्षणे आढळतात - १. नामाला कमीत कमी उपाधी आहे. २. नामात आरंभापासूनच भगवंताचे अस्तित्व असते. ३. नामाच्या अभ्यासात इतर साधनांचे फळ आपोआप मिळते.

आध्यात्मिक वाङ्मयाचे परिशीलन करून अखेर नामच हाती येते. विवेकाने निरर्थक संशयाचा त्याग करून जीवाला नामस्मरणाचा आनंद भोगता येतो.

भगवंत सार असून समस्त विश्व असार आहे. भगवंत आत्मा असून जगत अनात्म आहे. माणसाने आत्मानात्मविवेक करून किंवा सारासार विचार करून भगवंताचा शोध घ्यावा. भगवंत साचार आहे याचा अर्थ आचरणात आणता येण्यासारखा आहे. प्रयत्नाने भगवंताला जाणता येते समर्थ वाउगा संशय टाकून द्यायला सांगतात. गीता सांगते - 'संशयात्मा विनश्यति' व्यवहारातही डॉक्टरवर श्रद्धा असेल तर आजार लवकर बरा होतो. प्रवासातही ड्रायव्हरवर श्रद्धा ठेवावी लागते.

संशय घेऊच नये असे समर्थ म्हणत नाहीत. ज्याला शंका येत नाहीत, प्रश्न पडत नाहीत त्याची प्रगती होत नाही. म्हणून जाणत्या व्यक्तीला प्रश्न विचारलेच पाहिजेत. परंतु ते प्रश्न जिज्ञासुभावाने विचारावेत. आठमुठेपणाच्या, वाउगा, दुराग्रहाच्या, वितंडेच्या संशय नसावा अशी समर्थांची अपेक्षा आहे. शोधून पहाण्याच्या पद्धतीला काहीतरी गृहीतकृत्य स्वीकारावेच लागते. वाउग्या संशयाचा माणूस तेही स्वीकारत नाही. त्यामुळे तो चालूच शकत नाही आणि पाऊल टाकल्याशिवाय पोहोचण्याचे स्थान मिळणार नाही.

© www.madhaveeraghuveer.com

नव्हे कर्म ना धर्म ना योग काही।
नव्हे भोग ना त्याग ना सांग काही।
म्हणे दास विश्वास नामी धरावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥७६॥

अर्थ - माणसाच्या हातून धड कर्ममार्गाचे आचरण होत नाहि, धड धार्मिक वृत्तीने जगणे होत नाही, धड योगाचा अभ्यास होत नाही. धड अनासक्तपणे विरक्त जीवन चालवता येत नाही. धड पुष्कळ देहसुखसुद्धा भोगता येत नाही. तेव्हा समर्थ म्हणतात की माणसाने नामावर विश्वास ठेवावा.

स्पष्टीकरण - श्रीसमर्थांच्या काळी कर्ममार्गाचे आचरण करणारा किंवा धार्मिक विधि आचरणारा, योगाचा अभ्यास करणारा किंवा संन्यस्तवृत्तीने जगणारा माणूस आत्मजीवन जगतो असे मानले जात असे. अर्थात अशा माणसांची संख्यादेखील कमी होत जात होती. त्यामुळे अनुशासित जीवन दुर्मिळ होत चालले होते. शिस्तहीन समाज लवकर पराभूत होतो. नामामुळे माणसाच्या अंतर्यामी अनुशासनाची जाणीव आपोआप निर्माण होते. माणूस इतर गोष्टीं-विषयी शंका घेत नाही. पण नामाबद्दल शंका घेतो. परंतु समर्थ म्हणतात विश्वासाने नाम घ्या. त्यातून आपले कल्याण होईल.

कलियुगात कर्म, धर्म, भोग, योग, त्याग यातील कुठलेच गोष्ट यथासांग घडू शकत नाही. थोडेसे कर्म चुकले की केलेले सगळे कर्म वाया जाते. कर्मापाठोपाठ अभिमान बळावतो. त्यागाचाही अहंकार जडतो. भोगाने तृप्ती तर होत नाही पण नाना व्याधी बळावतात. तेव्हा नामावर श्रद्धा ठेवावी. भगवद्चिंतनाने या सर्व उणिवा दूर होतील. मात्र नामावर विश्वास असावा. नाहीतर क्षमापनेच्या मंत्रानेही यांत्रिकता निर्माण होऊ शकते.

माणसाचे कोणतेही कृत्य केले तरी त्याची पूर्तता ईशस्मरणाने होते हे विसरू नये. नामावर विश्वास ठेवावा. अधीरता नसावी. आज बी पेरली की लगेच उद्या उगवणार नाही.

करी काम निःकाम या राघवाचे।
करी रूप स्वरूप सर्वा जिवांचे।
करी छंद निर्द्वंद हे गुण गाता।
हरिकीर्तनी वृत्तिविश्वास होता॥८८॥

अर्थ - भगवंताबद्दलची वासना माणसाला निर्वासन बनवते. भगवंताच्या रूपाला मन जडले तर तो माणूस सर्व जीवांच्या अंतर्यामी भरलेले स्वरूपच बनतो. माणसाची वृत्ती भगवंताच्या गुणगायनात श्रद्धेने रमू लागली, भगवंताचे गुण गाण्याचा माणसाला नाद लागला तर तो आपोआप द्वंद्वरहित होतो.

स्पष्टीकरण - साधकाच्या दृष्टीने हा श्लोक अत्यंत महत्त्वाचा आहे. भगवंताच्या मार्गाकडे वळणाऱ्यांमध्ये फारच थोडे निष्काम भक्ती करतात बहुतेकांच्या मनात काही ना काही कामना असतेच. भगवंत स्वतः पूर्णकाम आहेत. आपण अपूर्णकाम आहोत. पण जर त्यांच्याशी संबंध जोडला तर पूर्णकाम होता येते. आपोआप भक्त निष्काम होतो. निर्गुण भगवंताच्या सगुण रूपाचे चिंतन करता करता भक्ताचे मन सूक्ष्म बनत जाते. व्यापक होत जाते आणि अंतर्यामी ज्याचे चिंतन चालू असते तेच रूप त्याला प्राणिमात्रांच्या अंतर्यामी दिसू लागते. याला निर्गुणरूपदर्शन म्हणतात. पुढे पुढे तर भगवंताचा छंद लागतो. नाद, ध्यास लागतो. मनाला तोषविणारे व्यसन लागते. मग त्याला देहाचा विसर पडतो परिस्थितीचा विसर पडतो. त्यामुळे सुख-दुःख, निंदास्तुती, मान-अपमान त्याला बाधत नाहीत. जीवनातील प्रत्येक घटनेमागे त्याला भगवंत प्रत्ययास येतो.

माणसाला रामाच्या प्राप्तीची इच्छा झाली की इतर इच्छा आपोआप नाहीशा होतात. मनाला अनेक गोष्टींचे आकर्षण असते. दूरदर्शन, निसर्गसौंदर्य, सुंदर चेहरा अशा अनेक गोष्टी मनुष्याला आकर्षित करतात. पण ही सगळी रूपे त्या रामाचीच आहेत किंबहुना रामच इतक्या रूपाने नटला आहे अशी भावना नामसाधनेने होते. संत कबीर म्हणतात -

अंदर राम बाहीर राम। जहाँ देखो सो राम ही राम।
जागत राम सोवत राम। सपनेमें देखा राजाराम।
कहत कबीरा भाव है निका जो देखो सो राम सरीखा॥

Eat cricket, Drink cricket, sleep cricket

चुना तंबाखू



समर्थ म्हणतात – तो गे तोचि तो राम सर्वांग पाहे। किंवा. रिता ठाव या राघवेवीण नाही। क्रिकेट

समष्टीत राम दिसू लागला म्हणजे व्यष्टीचे रूप देहणातळीवर आकर्षित करणार नाही. अमेरिकेत स्वामी रामतीर्थांना आकर्षित करण्यासाठी एक सुंदर युवती आली. परंतु तिच्यातही त्यांना जगन्नियंता भगवंताचे दर्शन झाले. व्यष्टी आणि समष्टी यांच्या भेदबुद्धीमुळे सगळी द्वंद्व निर्माण होतात. पण तो एकच त्रिविध गुणांनी नटलेला आहे अशी धारणा झाल्यास निर्द्वंद्व अवस्था प्राप्त होईल. ही अवस्था फार उच्च आहे. या अवस्थेत सारे भय नाहीसे होते. सारी द्वंद्वे, आपपर भाव संपून जातो. शारदा माता एकदा म्हणाल्या होत्या – माझी गोरी व काळी मुले आपापसात भांडत आहेत त्याला मी काय करू? ही उच्चावस्था आहे. भगवंत हेच आपले भावविश्व व्हावे. म्हणजे वैराग्यात स्वाभाविकता येईल. दमनाची ओढाताण संपून जाईल. नामावरील विश्वास हीच साधकाची वृत्ती होईल.

मनुष्याच्या अंतःकरणामध्ये रूपाविषयीची ओढ, विषयासंबंधी इच्छा आणि निरनिराळ्या द्वंद्वाविषयींचा हवे नकोपणा स्वभावतः असतो. तो वृत्ती नष्ट करता येत नाही आणि तसे करणे इष्टही नाही. परंतु धबधबा कोसळावा तसा वृत्तीचा प्रवाह ऐहिक विषयांकडे वहात असतो, तो रामाकडे वळवावा. या बाह्यविषयगामी वृत्तींना ईश्वरोन्मुख करा. मृगजळाच्या पाठीमागे धावण्याने व्यर्थ शीणच होतो. तो थांबेल आणि मानससरोवराच्या अंतर्यात्रेचा प्रारंभ होईल. आणि पावलापावलागणिक सुखसमाधान वाढत जाईल. आनंदाची कारंजी नाचू लागतील. बाह्यजगताची जणू जाणीवच रहाणार नाही. दुःख देणारे संबंध गळून पडतील. आणि ईश्वराच्या एकरूपतेच्या साक्षात्कारात माणूस लीन होऊन जाईल. जी इच्छा, जी वासना, जो काम प्रतिबंध करतो तोच त्या परमपुरुषाला अर्पण करून टाकायच्या म्हणजे क्रमाक्रमाने वासनांचे निरसन होत जाते. आणि मग या गुणानुवादाचे व्यसन लागते, मन आनंदाने भरून जाते. मन बुद्धीची निष्ठुर ओढाताण होणार नाही. मात्र त्यासाठी हरिकीर्तनाविषयी अंतःकरणाच्या वृत्तींना विश्वास वाटला पाहिजे.

© www.madhaveeraghuveer.com

अहो ज्या नरा रामविश्वास नाही।
तया पामरा बाधिजे सर्व काही।
महाराज तो स्वामी कैवल्यदाता।
वृथा वाहणे देहसंसारचिंता ॥८०॥

अर्थ - अहो, ज्या माणसाचा भगवंतावर भरवसा नसतो त्या माणसाला महा मूर्ख म्हणावे. त्या दीन मूर्खाला सर्व प्रकारची दुःखे भोगावी लागतात. सर्व सत्ताधीश भगवंत मोक्ष देणारा आहे. तो मालक असताना देहाची व संसाराची चिंता वाहणे व्यर्थ आहे.

स्पष्टीकरण - ज्याला भगवंताच्या अस्तित्वाबद्दल विश्वास नाही तो पामर. प्रत्येक माणसाला आपल्या जीवनात नाना प्रकारच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागते. प्रत्येक प्रसंगाच्या आघाताने त्याचे मन हेलकावे खाते. हीच त्याची बाधा समजावी. परंतु ईश्वराचा पाठिंबा मिळाल्यावर तो आपला रक्षणकर्ता आहे. या विश्वासाने माणूस स्वस्थचित्त बनतो. देहाची व संसाराची चिंता त्याला सतावीत नाही. त्याची चिंता विराम पावते. तो निर्भय होतो आणि पूर्ण निर्भयता हेच कैवल्याचे स्वरूप आहे.

श्रध्दारहित माणसाच्या मनात द्वंद्व असल्याने सगळ्या गोष्टींचा त्याला त्रास होत असतो. भगवंतावर विश्वास नसल्याने संसाराची वृथा चिंता करतो. चिंता करणे म्हणजे भगवंताचे अस्तित्व नाकारणे. आपण अनेकदा सवय म्हणून चिंता करतो, गरज म्हणून नाही. साधुसंतांना सर्व भूतमात्रांविषयी कळवळा असतो. त्यामुळे त्यांची चिंता ही खरी असते. ते नुसती चिंता करत नाहीत. तर त्यावर उपाय शोधतात आणि परिणाम भगवंतावर सोपवतात. समर्थांनी बालपणीच केलेली विश्वाची चिंता व्यापक होती. आणि त्यांनी त्यावर उपाय शोधला, अमलात आणला आणि निद्रिस्त समाजाला, भ्रमित झालेल्या जनजीवनाला प्रबोधनाची संजीवनी दिली आणि खूप मोठा लोकसंग्रह करून समाजबांधणीचे महान कार्य केले. सामान्य लोकांचे विचारप्रवर्तन केले.

पण आपण सामान्यजन काय करतो. उगीचच आपल्या कुटुंबाची, मुला-नातवंडांची चिंता करत बसतो. ज्या चिंतेतून काहीही साधत नाही अशा चिंतेला समर्थ वृथा चिंता म्हणतात.

© www.madhaveraghuveer.com

चिंता ही उद्याच्या समस्या सोडवत नाही, पण ती आजची शांति घेऊन जाते.

पुढे पुढे चिंता करणे हा स्वभावच बनतो. जे घडायचे आहे ते घडणारच आहे आणि जे घडायचे नाही ते घडणारच नाही. मग चिंता कशाला? नाथ म्हणतात -

सकळ जीवांचा करितो सांभाळ तुज मोकलील ऐसे नाही।
जैसी स्थिती आहे तैशापरी राहे कौतुक तू पाहे संचिताचे॥

भगवंत हा कैवल्याचा दाता आहे. संसारातील सुखदुःखे ही प्रारब्धानुसार मिळतात. त्या प्रारब्धाचे रडगाणे भगवंताजवळ गाऊ नये. उलट भगवंताच्या अनुसंधानात रंगून गेले तर संसाराच्या सुखदुःखाने मन विचलित होणार नाही.

ईश्वर आकाशात विराजमान आहे आणि त्याच्या कृपेने हे जग चांगले चालले आहे. God is in the heaven and everything is right in the world.

पामर म्हणजे क्षुद्र. कीव करावी असा जीव. ही अगदी वाईट अशी शिवी आहे. परंतु कल्याण करण्याकरता धडपडणारे अंतःकरण निराशेने पिळवटून गेल्यावाचून असा शब्द तोंडातून बाहेर येणार नाही. संतांची अशी ही 'अभाविण प्रीती' असते. अंतःकरणात विश्वास असल्यावाचून कोणत्याही प्रतिकूलतेला तोंड देता येणार नाही. आत्मविश्वास हा देखील श्रद्धाच आहे. शास्त्रपूत दृष्टीने ईश्वर नाकारण्याचा वेडेपणा करणे योग्य नाही. ईश्वराच्या अस्तित्वाला मान देणे हेच शहाणपणाचे ठरणार आहे. बुद्धिमंतांचे तेच खरे लक्षण आहे. सर्वसमर्थ अशा ईश्वराचे आपण बालक आहोत असे समजावे. तो सर्व व्यापाराचा नियामक आहे. त्याला निष्ठा अर्पण केल्यावर त्वदाशा सोडतीन हात देहाची आणि बापका मुलाच्या चिमुकल्या संसाराची वृथा चिंता कशाला?

विश्वं तद् भद्रं यदवन्ति देवाः। ——— कवि Browning म्हणतो ———
ईश्वर आकाशात विराजमान आहे आणि सर्व जग नीटच चालले आहे. जगात काहीही बिघडलेले नाही. बिघडली असेल तर ती आपली दृष्टी!

अजूनही वारे वाहताहेत. पक्षी किलबिल करतात. भरपूर पाऊस पडतो. अजूनही माणुसकी जिवंत आहे.

© www.madhaviveeraghuveer.com

मना पावना भावना राघवाची।
धरी अंतरी सोडि चिंता भवाची।
भवाची जिवा मानवी भूलि ठेली।
नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेली॥८६॥

अर्थ - मना, भगवंतावर ठेवलेला विश्वास पवित्र करणारा आहे. निर्दोष करणारा आहे. तो विश्वास अंतर्यामी बाळगून संसाराची चिंता तू सोडून दे. संसार सर्वस्वी खरा आहे असा मानवी मनाला भ्रम होतो. पण जी वस्तू खरी नाही ती मनाने अंतर्यामी धरून ठेवल्याने अखेर फसगत होते.

स्पष्टीकरण- अज्ञानामुळे माणसाच्या जीवनात अविवेक आढळतो. अविवेकामुळे त्याला भूल पडते व तो चुकीच्या कल्पना करतो. जी वस्तू खरी नाही ती पूर्ण खरी आहे हे भ्रमाचे लक्षण आहे. सत्य नसून सत्यासारखा भासणारा संसार आज ना उद्या हातचा निसटतो. सच्चिदानंद ईश्वर पूर्णपणे सत्य आहे. त्याचा खरेपणा मनाला पटवून घ्यावा. ईश्वराला मनाने घट्ट धरावे. मनाने केलेली ईश्वराची धारणा जीवाला पावन करते.

मनुष्याचे जीवन भाव- भावनांच्या कल्लोळाने भरलेले आहे. मित्र -मैत्रिणी, आप्त-स्वकीय, उत्सव-सोहळे, प्रतिष्ठा- मानपान या सर्व भाव-भावनांद्वारे तो स्वतःचे जीवन विकसित करण्याचा प्रयत्न करतो. पण यातूनच त्याच्या मनाला संसाराची चिंता लागून राहते. पण रामाबद्दलची पावन भावना अंतर्यामी धारण केली तर चिंतेचा आपोआप निरास होईल.

आचार्य चाणक्य म्हणाले होते - पूर्वीचे चांगले संबंध बिघडणे हे सर्वात मोठे दुःख आहे. घटस्फोट, गुरु-शिष्य संबंध संबंध चांगले असतानाच्या भावना व्यर्थ ठरतात. ज्या वस्तूला शाश्वत अथवा खरे अस्तित्व नाही त्याची धारणा व्यर्थ जाते. म्हणून आपला भावनात्मक गुंता भगवंताशी जोडावा. रजनीश म्हणतात खरा भक्त आपल्या मनाच्या फ्लोरवर कोणतीही कल्पनेचे अनाधिकृत बांधकाम बांधत नाही त्याच जागी भगवंताचे मंदिर निर्माण करावे. आईवडिलांचा लाडका मुलगा जेव्हा त्यांना वृद्धाश्रमात ठेवतो तेव्हा आधीच्या सर्व धारणा व्यर्थ गेल्या.

© www.madhaveeraghuveer.com

दुस हा उपसर्ग काठिण्य दर्शवितो.
दुःसह, दुर्धर, दुष्प्राप्य.



धरा श्रीवरा त्या हरा अंतराते।
तरा दुस्तरा त्या परा सागराते।
सरा वीसरा त्या भरा दुर्भराते।
करा नीकरा त्या खरा मत्सराते॥८०॥

अर्थ - श्री शंकराने ज्या भगवंताला स्वतःच्या हृदयात धारण केले त्या भगवंताला आपण मनाने धरावे असे केले तरच तरुन जाण्यास कठीण अशा भवसागरातून पार पडता येते. पोट हे भरुन पूर्ण करण्यास कठीण (दुर्भर) हे खरे असले तरी त्याला किंचित विसरायला शिकावे आणि दुष्ट मत्सराचा पिच्छा पुरवून त्याला नाहीसे करावे.

स्पष्टीकरण - मानवी जीवन अस्थिर, असुरक्षित आहे. कोणताही मोठा गचका न खाता शेवटपर्यंत निभावेल अशी खात्री कोणासच वाटत नाही. पण जो मनाने भगवंताला घट्ट धरतो तो जीवनातून सहीसलामत पार पडतो.

माणसाच्या पाठीमागे लागलेले पोट त्याला नाचवते. प्रपंचामध्ये कितीही मिळवले तरी पुरे पडत नाही. त्यासाठीच भगवंताच्या अनुसंधानाच्या अभ्यास करणाऱ्या त्यागी पुरुषाला त्यासाठीच भिक्षा मागण्याची परवानगी आहे.

क्रोध आणि लोभ हे दोन चांडाळ साधनी माणसाला भ्रष्ट करतात. लोभ हा तर स्वानंदाच्या प्रधान शत्रू समजावा. स्वानंद जितका आल्हादकारक तितका लोभ दाहक आहे. लोभाचे समूळ उच्चाटन केल्याखेरीज भगवंताचे सान्निध्य लाभणार नाही.

श्रीवर म्हणजे लक्ष्मीचा पती म्हणजेच विष्णु. राम हा विष्णुचाच अवतार आहे. तसेच हरा अंतराते म्हणजे भगवान शंकरांनीही ज्याला अंतःकरणात धरले आहे अशा रामाला तुम्हीसुद्धा तसेच धरुन ठेवा हा एक अर्थ तर दुसऱ्या अर्थानुसार, ज्ञानयोगाच्या परिभाषेनुसार अंतर असे जे मन तेच नाहीसे करा (हरा), मनाला अमन करा म्हणजे त्या उन्मनी अवस्थेतच स्वरुपसाक्षात्कार होईल. हा संसारसागर दुस्तर आहे. पण अंतर्यामी रामाला धरल्यास हा भवसागर आनंदाने पार करता येईल. तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्। ही रामनामा नौका। भवसागरी तराया॥ हे गीत प्रसिद्ध आहे.

© www.madhaveeraghuveer.com

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते।

माया भगवंताची शक्ती आहे. त्रिगुणात्मक आहे. तरुन जाण्यास कठीण आहे. पण मायेचा स्वामी जो भगवंत आहे त्यालाच शरण गेले तर तरुन जाणे सहज शक्य आहे. पाळलेला कुत्रा बाहेरच्या माणसांवर भुंकतो पण तेच जर त्याच्या मालकाने सांगितले तर तो त्याचे पायही चाटू लागतो. तसेच भगवंताला आपलेसे म्हटले की माया आपल्या वाटेला जात नाही.

अंतःकरणाचा निरास करा म्हणजे अंतःकरणातील संसाराचा निरास करा.

या श्लोकात १६ वेळा 'र' अक्षर आले आहे अनुप्रास अलंकाराचे उत्तम उदाहरण आहे. २,५,८,११ असा क्रम आहे. त्यामुळे एकेका पदाचे वा पदसंहतीचे अनेक अर्थ लागू शकतात.

कितीही खाल्ले तरी पोट कधी भरत नाही.

आमांतं [illegible] जाण जातवेदः जलाशयः ।
पूरिता नैव [illegible] जलाशयः [illegible] दुर्भरः ॥

तेव्हा या दुर्भर अशा पोटाला विसरा. यःकश्चित पोटाची खळगी भरण्यासाठी माणूस आयुष्यभर कुठेतरी विकला जातो. पोटाची मागणी काही संपत नाही. म्हातारपणी आहार कमी होण्याऐवजी खा-खा सुटते. त्यातून अतृप्ती वाढते. या अतृप्तीतून मत्सराचा जन्म होतो. जे मला मिळाले नाहि ते दुसऱ्याला मिळाले की मत्सर वाटू लागतो. मला मिळाले नाही तर दुःख वाटते आणि तेच इतरांना मिळाले की मत्सर वाटतो. मत्सराचे समर्थन करताच येणार नाही. ही एक मानसिक विकृती आहे.

इन्द्रूची समूळ तोडणे

दुर्भर असलेल्या कामाच्या बुंध्यावर वाढलेला, क्रोधादिंच्या फांद्यांनी विस्तारलेला संसाराचा हा महाप्रचंड वृक्ष एकदम बुंध्यावरच घाव घालून तोडणे शक्य असले तरी सोपे वा सोयीचे नसते. त्याच्या फांद्यांचा विस्तार आधी कमी करावा व मगच बुंध्यावर घाव घालावा हे बरे! म्हणून मत्सराशी निकराने झुंज द्या. त्याला नाहिसा करा म्हणजे दुर्भर अशा कामावरही मात करता येईल. बळ संपलेल्या शत्रूकडे दुर्लक्ष करणे सोपे असते.

© www.madhavveeraghuveer.com

जेव्हा आपण दुसऱ्यांमध्ये दोष पाहतो तेव्हा आपल्यामध्येच ते सूक्ष्मरूपाने असतात



मना मत्सरे नाम सांडू नको हो।
अती आदरे हा निजध्यास राहो।
समस्तांमध्ये नाम हे सार आहे।
दुजी तूळणा तूळिता ही न साहे॥९१॥

अर्थ - मना! विकृत मनोवृत्तीने प्रेरित होऊन नामस्मरण सोडू नकोस. पावित्र्याची भावना ठेवून नामाचा ध्यास ठेवावा. भगवंताच्या प्राप्तीची साधने अनेक आहेत. त्या सर्वांमध्ये नामस्मरण हे साररूप आहे. नामस्मरणाशी दुसऱ्या कोणत्याही साधनाची तुलना करताच येणार नाही.

स्पष्टीकरण - स्वस्वरूपाचे अखंड अनुसंधान राखणे हा सर्व साधनांचा प्राण आहे. निर्गुणाचे भान ठेवून सगुणामध्ये स्थिर करणारे साधन अभ्यासले पाहिजे. भगवंताच्या नामाहून दुसरे असे साधन नाही. परंतु नाम उपाधीरहित असल्याने माणसाला सहसा नाम आवडत नाही. नामाकडे चित्त वळवण्यासाठी नामाबद्दल अत्यंत आदराची भावना असावी लागते. त्यामुळे नामाची गोडी लावून घ्यावी. नाम हे साधन देशकालवस्तूच्या बंधनापलीकडे रहाणारे आहे. इतर साधनांची त्याच्याशी तुलना होणार नाही.

मत्सराचे अनेक पैलू आहेत. सम व्यावसायिकांमध्ये मत्सर अधिक असतो. ज्ञानदेवांसारख्या थोर संताला देखील शत्रू होते. तुकाराम महाराजांना पाण्यात पहाणारी माणसे होतीच. श्रीकृष्णाचा मत्सर करणारे जरासंध, शिशुपाल, दुर्योधन यांची काय अवस्था झाली? अध्यात्मात अहंकारी आणि मत्सरी मनुष्य कधीही तरणार नाही. मत्सरी माणसाला स्वतःचे हित कळत नाही. मत्सरामुळे सगळे गुण वाया जातात.

मागील श्लोकातील शेवटच्या शब्दाचा संदर्भ घेऊन हा श्लोक पुढे नेला आहे. मनामध्ये मत्सर ठेवून नामस्मरण सोडू नये. मत्सर म्हणजे एखाद्याबद्दलची तुच्छताबुद्धि! मत्सर हे आसुरी संपत्तीचे लक्षण सांगितले आहे. अशा दुष्ट माणसांची वृत्ती संत, ईश्वराचे भक्त, महात्मे यांची विनाकारण निंदा करण्याकडे असते.

मृगमीनसज्जनानां तृणजलसंतोषविहितवृत्तीनाम्।
लुब्धकधीवरपिशुना निष्कारण वैरिणो जगति॥

© www.madhaveeragnuveer.com

नाम हा जीव आणि शिव यांच्यातील दुवा आहे.
नाम सगुणही आहे निर्गुणही आहे.
देहबुद्धी नष्ट करणे हेच नामाचे साधक होणे.

तरुण, सुंदर, शृंगारलेल्या शरीरात प्राण मात्र नसावा तरी मनामध्ये मत्सर असलेल्या माणसाची अवस्था होते. मत्सराने अंतःकरण भरून राहिलेली माणसे इतरांचे काही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीमध्ये नसतात आणि मग त्यांना घोर अधःपात सोसावा लागतो. गीतेत भगवान म्हणतात-

ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम्।
सर्वज्ञानविमूढांस्तान् विद्धि नष्टानचेतसः॥ ३.३२

किंवा १८ व्या अध्यायात हे गीताज्ञान कुणाला देऊ नये हे सांगताना - जो माझा द्वेष करतो अशा तपोहीन व अभक्त माणसाला हे ज्ञान सांगू नये असे म्हणतात.

अत्यंत श्रेष्ठ असे सोपे आणि प्रभावी असलेले ईश्वराचे नाम घ्यावेसे वाटत नाही त्यामागे हीच तुच्छतेची सामान्यपणाची भावना असते. नाममहात्म्य म्हणजे त्यांना केवळ गौरवाचे, पोकळपणाचे बोलणे वाटते. व्याजस्तुती वाटते आणि त्यामुळे नाम घेतले जात नाही. किंवा घेतले तरी त्यामागे तेवढी श्रद्धा नसते. म्हणून पुढच्याच ओळीमध्ये समर्थ सांगतात - रामनामाचा निजध्यास असावा. सातत्याने लक्षपूर्वक ते घ्यावे. ते घेताना मनामध्ये नामविषयी आदराची भावना असावी. माणसाच्या उद्धाराची जेवढी म्हणून साधने आहेत. त्यात नाम हे सारभूत आहे. त्याच्याशी तुलना करता येईल असे दुसरे साधन नाही. म्हणून नामाविषयी उपेक्षाही नको व कंटाळाही नको. ते घेत रहावे. त्याचे फळ निश्चितपणे मिळते.

वामनपंडित म्हणतात -

अजित नाम वदो भलत्या मिसे।
सकल पातक भस्म करीतसे।
न कळता पद अग्निवरी पडे।
न करि दाह असे न कधी घडे॥

गुंगीचे औषध दिल्यावर अंक मोजायला सांगतात. ते थांबले म्हणजे देहभान हरपले असे समजतात. तसे नाम घेता घेता 'मी नाम घेतो' हे स्मरणही रहात नाही तेव्हा देहबुध्दीचा विसर पडतो व नामधारक एकांतात जातो. पेढा कसाही खाल्ला तरी गोडच लागतो.

गोंदवलेकर महाराज

© www.madhaveeraguveer.com

प्रार्थी - हरिरायाचे आयुष्य तर नाम हे मनाचे जीवन आहे नामाला श्वासाच्या पावलांनी, श्वासाला शिकवावे आणि श्वासाला संग लागू देऊ नये.

बहु नाम या रामनामी तुळेना।
अभाग्या नरा पामरा हे कळेना।
विषा औषध घेतले पार्वतीशे।
जिवा मानवा किंकरा कोण पुसे॥८२॥

अर्थ- भगवंताची नामे अनेक प्रकारची आहेत पण रामनामाबरोबर त्यांची तुलना होऊ शकत नाही. पण परमार्थदृष्ट्या भाग्यहीन असणाऱ्या माणसाला दुर्दैवाने हे कळत नाही. प्रत्यक्ष श्रीशंकराने हलाहल विषाचा दाह शांत करण्यासाठी रामनाम घेतले. जिथे साक्षात शिवशंकर औषध म्हणून रामनाम सेवन करतात तिथे दीन मानवी जीवांची किंमत ती काय?

स्पष्टीकरण - ईश्वराचा आदिसंकल्प सृष्टीच्या आरंभी दिव्य नाद-रूपाने प्रगट झाला. त्या अनाहत नादास ओंकार म्हणतात. हा अनाहत नाद सर्व पिंडाच्या अंतर्यामी वास करतो. त्याचेच आहत किंवा व्यक्त शब्दरूप म्हणजे राम होय. ओंकार हे सूक्ष्म तर रामनाम हे स्थूल अंग आहे. आणि म्हणूनच प्रत्येक सिद्धमंत्रामध्ये ओम किंवा राम असतो.

प्रपंचामध्ये पैसेवाल्या माणसाला आपण भाग्यवान समजतो तर परमार्थामध्ये मनाने रामनामाला चिकटणाऱ्या माणसाला भाग्यवान मानतात. कारण इतर साधनांचे कष्ट न करता अशा माणसाला पारमार्थिक अनुभव सहज येऊ शकतात. परमार्थाच्या दृष्टीने ज्याचे भाग्य गौण असते अशा माणसाला रामनामाचे महत्त्व कळत नाही.

खरं तर अध्यात्मामध्ये असा संकेत आहे की आपण जो साधनमार्ग स्वीकारला आहे त्याचे महत्त्व सांगताना अन्य साधनमार्गांना तुच्छ लेखू नये. मात्र नामाच्या महिमा गाताना सगळ्या संतांनी हा संकेत धुडकावून लावला आहे. हरिपाठाच्या अभंगात माऊली म्हणतात - एक तत्त्व नाम दृढ धरी मना। हे सांगताना योग-याग-विधी यांना गौणत्व दिले आहे. समर्थांनी देखील नामाच्या तुलनेत व्रते, दान, उद्यापने यांच्या मर्यादा दाखवून दिल्या आहेत. तर गोंदवलेकर महाराज म्हणतात - नामाने उशीरा पण हमखास काम होईल. यात कोणताही अभिनिवेश नाही किंवा प्रचाराचे तंत्रही नाही.

© www.madhaveeraghuveer.com

रामनाम सर्वश्रेष्ठ आहे हे विज्ञानानेसुध्दा सिध्द केले आहे. 'राम' या शब्दाच्या उच्चाराने कुंडलिनी शक्तिवर आघात होतो. स्पंद, वेग व तरंग यांचे मापन केले असता रामनाम हे सर्वात परिणामकारक आहे. हे कसोटीने सिध्द झाले आहे. मात्र त्याचे महत्त्व ज्याला कळत नाही त्याला अभागी आणि पामर म्हटले आहे.

देवदेवतांची सहस्रावधि नामे आहेत पण कोणतेही नाम रामनामाच्या तोडीचे नाही. आराध्यदेवतेविषयी असा दृढविश्वासच हवा नाहीतर त्याचे तितकेसे फळ मिळणार नाही.

पातिव्रता नेणे आणिकांची स्तुती
सर्वभावे पति ध्यानी मनी ।।

रामरक्षेच्या शेवटीही शंकर पार्वतीला (वराननेला) हेच सांगतात विज्ञानाच्या कसोटीवर मंत्रसामर्थ्य ठरवले जाते. त्यानुसार गायत्रीमंत्र सर्वात प्रभावी व श्रेष्ठ आहे. आणि एकेरी शब्दांच्या नामात राम हे नाव शब्दोच्चार मापनाच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे. रक्तदाब, वगैरे विकारांवर स्पष्ट, दीर्घ, मंद अशा पद्धतीने रामनामाच्या जपाचा फार उपयोग होतो.

समुद्रमंथनाच्या वेळी विषप्राशनाने झालेला दाह शमवण्यासाठी भगवान शंकरांनी हे रामनाम औषध म्हणून घेतले आणि त्या पार्वतीपतीला विलक्षण आराम झाला. त्याच्यापुढे सामान्य माणसांच्या आपत्ती त्या काय? आणि त्यातून होणाऱ्या वेदना त्या किती? महाभयंकर हलाहल विषाचे दुष्परिणामही ज्या नामाच्या सामर्थ्यामुळे निष्प्रभ ठरले त्या नामासमोर या सामान्य व्यथा - वेदनांचे मूल्य कितीसे असणार?

मनाच्या श्लोकांप्रमाणेच अध्यात्मरामायण, व तुलसी - रामायणात, पुराणांमधून शंकरांची ही रामभक्ती मोठ्या गौरवाने वर्णन केली आहे. सर्वमान्य असलेल्या उदाहरणांनी सामान्यांच्या मनावर अनुकूल परिणाम सहजच घडतो.

जेणे जाळिला काम तो राम ध्यातो।
उमेसी अती आदरे गुण गातो।
बहु ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथे।
परी अंतरी नामविश्वास तेथे॥८३॥

अर्थ - श्री शंकरांनी मदनाला जाळले. ते शंकर रामाचे ध्यान करतात. पार्वतीला ते अत्यंत आदराने, पूज्यबुद्धीने श्रीरामाचे गुणवर्णन करतात. श्रीशंकर मोठे ज्ञानी, वैराग्यशील व सामर्थ्य संपन्न म्हणून प्रसिद्ध आहेत. परंतु असे असूनसुद्धा त्यांची नामावर दृढ श्रद्धा आढळते.

स्पष्टीकरण - वैराग्य हे परमार्थाचे हृदय तर ज्ञान परमार्थाचा मेंदू समजावा. हे दोन अवयव बलवान असले की परमार्थाचे ऐश्वर्य पूर्णपणे दृष्टीस पडते. अशा परमार्थसंपन्न जीवनात एवढी नामाची श्रद्धा पाहून समर्थांना कौतुक वाटते. ज्यांच्या जीवनात ज्ञान, सामर्थ्य व वैराग्य बेताचेच असते, त्यांनी तर नामावर अतिशय श्रद्धा ठेवून नामस्मरण करायला पाहिजे.

बऱ्याचदा अशी कल्पना असते की जे विकारी आहेत, भयग्रस्त आहेत, मतिमंद आहेत अशा लोकांनी नामावर विश्वास ठेवून आपले जीवन सुधारावे. समर्थ या चुकीच्या समजुतीला छेद देतात. नामस्मरण केवळ औषध नसून अमृत आहे. विकार असेल तरच औषध घ्यावे असे नाही. भगवान शंकर रामाचे ध्यान तर करतातच पण पार्वतीसह रामचंद्राचे गुणगान करतात. शिवपार्वती मोठ्या आवडीने रामचरित्राचे गायन-श्रवण करतात. महेश पार्वती प्रति। विशद गुण सांगती। सप्रेम होतसे दुणा। श्रीराम राम हे म्हणा॥

ऐवढ्या ज्ञानी पुण्यपुरुषाच्या अंतर्यामी रामनामाबद्दल श्रद्धाभावआहे. व्याकरणापासून वेदांतापर्यंत आणि शिल्पशास्त्रापासून ज्योतिषापर्यंत सर्वप्रकारच्या ज्ञानविज्ञान शाखेचे ते प्रवर्तक आहेत. त्यांचे वैराग्य हे ज्वलन्त आहे. त्या वैराग्याच्या तेजानेच तर मदन जळून गेला. असे ज्ञानवैराग्यसंपन्न शंकर रामनामावर विश्वास ठेवतात.

काशी - मृत्यु - श्रीशंकर कानामध्ये रामनाम

Date 28.9.2013

विठोने शिरी वाहिला देवराणा।
तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा।
निवाला स्वये तापसी चंद्रमौळी।
जिवा सोडवी राम हा अंतकाळी ॥८०॥

अर्थ - पांडुरंगाने श्रीशंकराला प्रेमादराने आपल्या मस्तकावर धारण केले त्या श्रीशंकराला रामचंद्राचा ध्यास लागलेला आहे हे तुम्ही जाणत नाहि काय? स्वतः मोठा तपस्वी असणारा श्रीशंकर रामनामाने शांत झाला. माणसाचा अंतकाळ आला असता खरोखर भगवंत त्याची सुटका करतो.

स्पष्टीकरण - भगवंतावर अतूट विश्वास हा भक्तांच्या अध्यात्मिक जीवनातील श्वासोच्छ्वास असतो. तो विश्वास कसा असावा याचा पौराणिक आदर्श श्रीशंकराच्या चरित्रात दिसतो. जीवनाचा अंतकाळ भगवंताच्या अनुसंधानात जाणे मोठे भाग्याचे समजतात. नामाने हे भाग्य लाभते.

पंढरपूरला पांडुरंगाची जी मूर्ती आहे तिच्या मस्तकावर शिवलिंगाचा आकार आजही पहाता येतो. इथे शंकराला उद्देशून देवराणा हा शब्द वापरला आहे. रामाला शंकराचा आणि शंकराला रामाचा ध्यास लागला आहे. अज्ञानी लोकांना हे कळत नसल्यामुळे ते शैव आणि वैष्णव असा वाद निर्माण करतात. देवाच्या पातळीवर कोणतेही द्वैत नाही. आणि भक्त प्रामाणिक असेल तर तोही द्वैत निर्माण करत नाहि. वारकरी संप्रदायातील राम कृष्ण हरि या मंत्राचा अर्थच असा आहे की राम, कृष्ण आणि विठ्ठल हे तिन्ही एकच आहेत.

हलाहल प्राशनाने झालेला दाह शांत करण्यासाठी शंकराने गंगा, चंद्र, नाग या शीतलता देणाऱ्या गोष्टी धारण केल्या पण केवळ रामनामानेच दाह शमला. याच रामनामाने अंतकाळी मोक्ष मिळू शकतो. जे आयुष्यभर केले तेच अंतकाळी आठवणार आहे. जो मार्ग परिचयाचा आणि सवयीचा आहे त्याच मार्गाने प्राण बाहेर पडतो. ध्यानामध्ये प्राणशक्ती ऊर्ध्वगामी तर विकारांमध्ये प्राणशक्ती अधोगामी असते. ज्याचा रामनामाचा अभ्यास आहे त्याला अंतकाळी रामनामच आठवेल आणि असा जीव मुक्त होईल.

एकांताचा नाम हेच करी मना। हरिची भावना देहीं [illegible]
नामामध्ये तत्त्व नाही हे अभ्यासा।

मजा राम विश्राम योगेश्वरांचा।
जपू नेमिला नेम गौरीहराचा।
स्वये नीववी तापसी चंद्रमौळी।
तुम्हा सोडवी राम हा अंतकाळी॥८७॥

अर्थ - श्रीशंकरासारख्या अतिशय श्रेष्ठ योगी पुरुषांना श्रीराम आराम देतो. शंकर आणि पार्वती दोघे नित्य नेमाने रामनामाचा जप करतात. नामजपाने श्रीशंकरांचा दाह शमला. आपण जर जप केला तर तो राम अंतकाळी आपली सुटका करेल.

स्पष्टीकरण - जो माणूस भगवंताचे नामस्मरण अभ्यासतो त्याच्या एकंदर वासना मुळातच क्षीण होतात. शिवाय मृत्यु पावणाऱ्या जीवास पुढील जीवनक्रम दाखवण्याची एक व्यवस्था आहे. त्या व्यवस्थेच्या नियमानुसार भगवंताचे नामस्मरण करणाऱ्याला वरचा वर्ग मिळतो.

विश्राम म्हणजे विश्रांती. विषयचिंतन ही शीण आहे. तर ईश्वरचिंतन ही विश्रांती आहे. प्रभू रामचंद्र ही योगेश्वरांची विश्रांती आहे. योगेश्वर म्हणजे शंकर हा एक अर्थ तर सिद्धींचा वापर करणारे योगी हा दुसरा अर्थ आहे. अशा योग्यांच्या जीवनात सिद्धींच्या वापरामुळे एक अशांती आढळते. त्यांना रामनामाने पुन्हा शांति, विश्रांती प्राप्त होते. जीवनात भक्तीशिवाय विश्रांती नाही. हे लक्षात घेऊन श्रीशंकर नित्यनेमाने जप करतात. यात सातत्य आहे. अनेकदा साधनेची शिस्त लावून घ्यावी लागते. कष्टाचा किंवा बैठकीचा नेम करायलाच हवा. भगवान शंकरांसारखे ज्ञानी आणि वैराग्यशील देवही असा नित्यनेम पाळतात.

येथे पुनरुक्ती हा दोष नाही. अंतःकरणाच्या उत्कटतेचे ते एक प्रतीक आहे. पतिव्रतेला पतिविषयी, वत्सल मातेला बालकाविषयी, स्वामिभक्त सेवकाला धन्याविषयी आणि शिष्याला आपल्या गुरुविषयी जे वाटते ते तो पुन्हापुन्हा बोलण्यात असतो. संत भक्तिभावाने आपल्या आराध्यदेवतेचे गुण गाताना दमत नाहीत. दूरदर्शन, दूरश्रवण, दूरगमन, भूतभविष्यज्ञान या सिद्धी प्राप्त असणाऱ्या योगी पुरुषांच्या मनात असमाधान असते. त्यासाठी त्यांनाही रामनामाचाच आश्रय घ्यावा लागतो.

© www.madhavvairagkar.com

मुखी राम विश्राम तेथेचि आहे।
सदानंद आनंद सेऊनि राहे।
तयावीण तो सीण संदेहकारी।
निजधाम हे नाम शोकापहारी॥८६॥

<u>अर्थ</u> - परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या वाणी दिसायला चार दिसल्या तरी एकाच वाक्‌शक्तीच्या त्या अवस्था आहेत. त्यापैकी एकीमध्ये बाकीच्या तीन असतातच. म्हणून मुखी राम याचा अर्थ मनापासून भगवंताचे नाम घेणे असा समजावा.

प्रत्येक जीवाला आनंदाची स्वाभाविक ओढ असते. इंद्रियातून आनंद मिळवण्याच्या धडपडीमध्ये त्याला खंडित आनंद मिळतो. आनंदाचे स्थान अंतर्यामीच आहे. तिथपर्यंत पोचण्यास वाणीसारखा सोपा उपाय नाही. त्या वाणीला भगवंताच्या नामाचा नाद लावला तर नाम एका वाणीमधून दुसरीमध्ये अधिकाधिक खोल जाते. अखेर ते स्फुरणरूप परावाणीपर्यंत पोचते. तिथे स्वानंदाचा साक्षात परिचय होतो. स्वानंदाला खंड पडणे कधीच माहीत नाही म्हणून त्याला सदानंद किंवा नित्यानंद म्हणतात.

दिह धातुचा अर्थ आहे माखणे, लेप लावणे, भ्रष्ट करणे अपवित्र खराब करणे. सम + दिह म्हणजे संशय घेणे, अनिश्चितपणा येणे. स्वानंदाचे स्वच्छ प्रतिबिंब पडण्यासाठी अंतःकरण स्थिर व स्वच्छ पाहिजे. संशयी वृत्तीने ते तसे राहू शकत नाही. अस्थिर व मलिन अंतःकरणातील आनंद लगेच आपोआप लोपतो. आणि जिथे आनंद नाही तिथे शीणच उरतो.

वास्तविक परमात्मा मानवी कल्पनांच्या पलीकडे आहे. पण ओंकाररुपी शब्दब्रह्म होऊन तो मानवाच्या ज्ञानकक्षेमध्ये आला. ओंकार हे संतांचे नाव होय. नाम आणि नामी यांचा अभेद असल्याने नामात रहाण्यावाचून रामाला गत्यंतर नसते. नामात रंगलेल्या जीवाला देहाचे भान उरत नाही. आणि देहभान गेल्यावर दुःख कसले आणि शोक कसला!

परमात्म्याची वैखरी स्वरूपाला प्रतिरूप

मनातील विचारचक्र ताणतणाव निर्माण करते. विचारांची जागा नामाने घेतली की सारे ताणतणाव नाहीसे होतात हीच खरी विश्रांती आहे. मात्र नामाचा फायदा एवढाच मर्यादित नाही. ज्या वैष्णवांना नामामृताची गोडी लागली त्यांना सर्व

प्रकारच्या सिद्धी प्राप्त होतात. नामसंकीर्तनात भक्तगण देहभान हरपतात. अशा नामानंदात थोडे सुध्दा दुःख शिल्लक उरत नाही.

मात्र अनेकांना नामाविषयी संदेह वाटतो. खरेच नाम एवढे प्रभावी आहे का अशी शंका येते. परंतु अशी शंका येताच साधक नामापासून दूर जातो. विषय चिंतनात अडकतो आणि विश्रांतीच्या जागी शीण सुरु होतो. दुर्दैवाने वाईट माणसाची वाईटावर जेवढी श्रध्दा असते तेवढी चांगल्या माणसांची चांगल्यावर नसते. खरे तर भक्तीच्या दालनात प्रवेश करताना तर्क आणि संदेह या चपला बाहेर काढून ठेवाव्यात. वस्तुतः नाम शोक नाहीसे करणारे आहे. नाम हेच निजधाम म्हणजेच परब्रह्म आहे. अखंड नामाने प्राप्त होणारी शांती हीच ब्राम्ही स्थिती आहे. गोंदवलेकर महाराजांनी केवळ नामाने ही अवस्था प्राप्त करुन घेतली. म्हणूनच म्हणतात-

जयाचा जनी जन्म नामार्थ झाला।
जयाने सदा वास नामात केला।
जयाच्या मुखी सर्वदा नामकीर्ति।
नमस्कार त्या ब्रम्हचैतन्यमूर्ती॥

आपली उत्पत्ती, स्थिती, लय नामाच्याच अधिष्ठानावरती आहे. ही स्तुती नसून वस्तुस्थिती आहे.

प्रेमाने ईश्वराचे नाम घेणारी माणसे प्रतिकूल परिस्थितीत सुध्दा बुध्दीकच समाधानी असतात. तापाने फणफणलेल्या माणसाला देवाचे नाव घेत अंगावरुन हळुवारपणे हात फिरवला तर त्याला बरे वाटते. असा अनुभव आहे. रामनामाला स्थळकालाचे बंधन नाही. घेणाऱ्याच्या पात्रतेचा प्रश्न नाही. गुरुकडूनच घ्यावे असा आग्रह नाही. ते सहजसुलभ तरीही अलौकिक आहे.

परमार्थामध्ये आपण काय करतो यापेक्षा कोणत्या भावाने करतो याला महत्व आहे. श्रध्देने, निष्ठेने साधन केले तर त्याचा परिणाम दिसून येतो. नाहीतर संशयात्मा विनश्यति। असा अनुभव येतो. व्यापारी विश्वासाला जपतात, शब्दावर भरोसा. तेव्हा नाममहात्म्यावर उगीच शंका घेऊ नये. नाम हे शोकसंताप नाहीसे करणारे आहे. सासरी असणाऱ्या मुलीला माहेर जसे वाटते तसे दडपणाखाली वावरणारे मन नामस्मरणाने सुख अनुभवते.

classmate Date 29.5.2013 Page

मुखी राम त्या काम बाधू शकेना।
गुणे इष्ट धारिष्ट त्याचे चुकेना।
हरीभक्त तो शक्त कामास मारी।
जगी धन्य तो मारुती ब्रह्मचारी॥८७॥

<u>अर्थ</u>- ज्याच्या मुखात रामनाम असते त्याला कामवासना अडथळा करु शकत नाही. कारण नामाच्या पाठबळाने कामवासनेला जिंकण्यास आवश्यक असणारे धैर्य त्याला हमखास प्राप्त होते. भगवंताचा भक्त प्रबळ कामवासनेला मारुन टाकतो. ब्रह्मचारी मारुती जगामध्ये खरोखरच धन्य झाला.

<u>स्पष्टीकरण</u>- सामान्य माणसाच्या जीवनात तहान, भूक, झोप याप्रमाणेच कामवासना ही प्राथमिक गरज आहे. भारतीय जीवनपद्धतीमध्ये कामवासनेच्या रीतसर तृप्तीला पवित्र मानलेले आहे. मात्र त्यातही संयम पाळल्याखेरीज अध्यात्म-साधना कठीण होते. त्यासाठी कामवासनेशी मुकाबला करावा लागतो. मात्र जो साधक भगवंताच्या नामाचा अभ्यास करतो त्याला कामवासनेचे आवेग आवरण्याचे मानसिक बळ प्राप्त होते.

आपल्या मनाची शक्ती प्रथम साठवायची व मग तिला सूक्ष्म बनवून भगवंताच्या अनुसंधानासाठी वापरायची असा साधनेचा सामान्य क्रम आहे. मनाला इंद्रियांच्या मागे धावायला मोकळीक दिली की मनाची शक्ती क्षीण होते त्यातल्यात्यात कामवासनेच्या तृप्तीमध्ये तर मन विशेष शक्ती गमावते. कामवासनेचा जोर मोठा जबर आहे. परंतु खरा साधक भक्त भगवंताच्या पाठिंब्याने त्या बळवान वासनेला मारुन टाकतो. कामवासनेला संपूर्ण पराजित करणारा, जीवन धन्य करणारा हनुमंत हे ब्रह्मचर्याचे उत्तम उदाहरण आहे. श्रीसमर्थांना तर तो आदर्श महापुरुष होता आणि स्वतः समर्थदेखील ब्रह्मचारी असल्यामुळे म्हणून जगात धन्य झाले. या श्लोकात त्यांचे स्वतःचेच वर्णन आहे.

मनुष्य काम आणि राम यांचे चिंतन एकाचवेळी करु शकत नाही. संत कबीर म्हणतात - जहाँ काम तहाँ राम नहीं। जहाँ राम तहाँ काम नहीं। सांसारिक मनुष्य दीर्घकाळ कामचिंतन करत असतो तर अगदी अल्पकाळ रामाचे चिंतन करतो.

साधान हनुमंताचा अवतार —

प्रपंच x परमार्थ Ratio | [illegible]

हे थोडावेळ घेतलेले रामनाम वाया जरी जात नसले तरी त्यामुळे कामावर विजय मिळवता येत नाही. त्यासाठी सतत रामनामात रहायला हवे. असे केल्याने हनुमंताला विषयचिंतन करायला सवडच मिळाली नाही. साधक जेव्हा अखंड रामनाम घेतो तेव्हा नाम पराणीला पोहोचते. पराणी नाभीजवळ आहे आणि कामविकाराचे केंद्रदेखील नाभीजवळच आहे.

नाम पराणीला पोहोचले की कामकेंद्र उध्वस्त होते. म्हणून अखंड नामस्मरणात असणाऱ्याला कामविकार बाधू शकत नाही. गुणे या शब्दाचे दोन अर्थ होतात. एक म्हणजे सत्वगुणामुळे आणि दुसरा म्हणजे सगुण उपासनेमुळे. या दोन्ही गोष्टी धारिष्ट्य वाढवणाऱ्या आहेत. सत्वगुण स्थिरचित्त असतो. तो कोणत्याही परिस्थितीत अविचल रहातो. दासबोधात म्हटले आहे.

विषई धावे वासना। परी तो कदा डळमळेना।
ज्याचे धारिष्ट चळेना। तो सत्वगुण।।

याचा अर्थ भक्ताच्या मनात विषयचिंतनाचा विचार जरी आला तरी त्याचे आवर्तन चालू रहात नाही. Frequency नाही नामस्मरणाने त्याला छेद दिला जातो. नामस्मरणाने संयमाचे सामर्थ्य वाढते. हनुमंत लंकेत रावणाच्या महालात गेला तेव्हा तिथे त्याने अनेक स्त्रिया पाहिल्या पण त्यामुळे त्याच्या बुद्धीत फरक पडला नाही. विषयवासना त्याला आकर्षित करू शकली नाही म्हणूनच रामरक्षेच्या कवचामध्ये - शाक्येनो हनुमत्प्रभुः। म्हटले आहे. संत एकनाथ महाराज भागवतात म्हणतात.

जो कोणी स्मरे माझे नाम। तिकडे पाहून शके काम।।
नाममुळे भक्ताला भगवंताची शक्ती प्राप्त होते व तो निर्भय होतो.

माणसाला गरज बाधत नाही तर चैन बाधते. नामामुळे कामाला बाधणारे स्वरूप येत नाही. हे नामाचे सामर्थ्य आहे. नामाच्या उच्चारामुळे इष्टदेवतेचे गुण साधकाला चढत्या प्रमाणात सहजपणे लाभतात. नामस्मरण हे तंत्रविज्ञान आहे. ते अधिभौतिक अध्यात्माशी जोडून देते. जो नामधारक आहे तो शक्त, समर्थ होतो. या धारिष्ट्याच्या बळावर तुकाराम महाराज आपल्या राशीत खुशाल शनी पाठवून द्या असे ज्योतिषाला सांगतात.

बहु चांगले नाम या राघवाचे।
अती साजिरे स्वल्प सोपे फुकाचे।
करी मूळ निर्मूळ घेता भवाचे।
जिवां मानवां हेचि कैवल्य साचे।।८८।।

अर्थ - 'राम' हे नाम अतिशय चांगले आहे. ते अत्यंत सुंदर, लहानसे, सोपे, बिनखर्चाचे आहे. रामनाम घेतल्याने संसाराचा समूळ उच्छेद होतो. मानवी जीवांना रामनाम हे स्वानंदसाधन आहे.

स्पष्टीकरण - मानवी देहात सच्चिदानंद आत्मा वाणीच्या रूपाने प्रगटला. स्वानंदापर्यंत पोहोचायचे असेल तर वाणीसारखे साधन नाही. 'राम' हा वाणीचा अर्क आहे. तो अत्यंत सहज, सुलभ व नित्यप्राप्त आहे. रामनामामुळे मनुष्य स्वतःच्या अंतःकरणात उतरू लागतो. त्यातून संसाराचे मूळ असलेली वासना क्षीण होते. इतरही अनेक साधने आहेत. परंतु त्यांना काही ना काही उपाधी आडवे. रामनामाचा अभ्यास कोणालाही करता येतो.

इतर कोणत्याही मंत्रापेक्षा रामनामामध्ये अधिक शक्ती आहे. हे विज्ञानाने सिद्ध झाले आहे. र हा अग्निवर्ण असून त्यात सूर्यशक्ती आहे तर 'म' मध्ये चंद्राची शीतलता आहे. त्यामुळे रामनाम हे संतुलित आहे. रामाचे नामकरण प्रत्यक्ष वसिष्ठ महर्षींनी केले आहे. ते सामान्य कसे असेल? त्याचा उच्चार सोपा आहे. अक्षरे कमी आहेत तरीही अत्यंत सुंदर व परिणामकारक आहे. उच्चारताच रामाचे सात्त्विक सौंदर्य मनामध्ये भरते. ते सोपे, लहानसे, बिनखर्चाचे असल्यामुळे त्याच्यातील सामर्थ्याविषयी शंका घेणाऱ्यांना समर्थ सांगतात. भवाचे मूळ निर्मूळ करून साधकाला जन्म-मृत्यूच्या चक्रातून सोडवण्याचे सामर्थ्य या रामनामात निश्चित आहे. त्यामुळे दुःखाची निवृत्ती होते.

संतांचे वर्णन करताना ज्ञानेश्वर माऊली वर्णन करतात - मार्तंड जे तापहीन। तेजस्वी, पराक्रमी असूनही शांत, प्रसन्न तसे हे रामनाम आहे. नमः शांताय तेजसे। हे वर्णन इथे योग्य आहे. रामनाम हे बहु चांगले आहे, दोन्हीकडून अनुकूल आहे. अतिसाजिरे आहे. संतमहात्म्यांच्या कृपेने ते मानवी जीवांना फुकट लाभले आहे.

जनी भोजनी नाम वाचे वदावे।
अती आदरे गद्य घोषे म्हणावे।
हरिचिंतने अन्न सेवीत जावे।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे॥८९॥

अर्थ - समूहात वावरताना व भोजन करताना वाचेने भगवंताचे नाम घ्यावे. भगवंताचे नाम आदराने, स्पष्टपणे उच्चारावे. तसेच ते मोठ्याने पण म्हणावे. भगवंताच्या अनुसंधानात राहून अन्न सेवन करावे. असे केले असता विनासायास भगवत्प्राप्ती होते.

स्पष्टीकरण - आहारशुध्दी झाली तर सत्वाची / अंतःकरणाची शुध्दी होते. अंतःकरण शुध्द झाले की स्मृती स्थिर होते. आणि एकदा स्मृती स्थिर झाली की सर्व हृदयग्रंथींचा सर्वथा नाश होतो. आरसा स्वच्छ केला की त्यात आपले मुख स्वच्छ दिसते. तसे अंतःकरण स्वच्छ केले तर त्यात स्वरूप स्वच्छपणे अनुभवाला येते. आणि अंतःकरणाची शुध्दी होण्यासाठी आहाराची शुध्दी व्हावी लागते. आणि सर्व इंद्रियांमध्ये रसनेला फार महत्व आहे ज्याने जीभ जिंकली त्याने अर्धा रस्ता आक्रमला असे म्हणतात. साधकाने आपला आहार कटाक्षाने संभाळावा, अन्न ताजे व सात्विक असावे. पचनाला जड असलेल्या अन्नाने सुस्ती येते. जरूरीशिवाय बाहेरचे अन्न खाऊ नये.

अन्न खाणे आणि कामवासना भोगणे या दोन प्रसंगामध्ये माणसाची वृत्ती चटकन पालटते. या दोन्ही प्रसंगी जो आपली वृत्ती नामापासून ढळू देत नाही त्याला भगवंताचे दर्शन दूर नाही. मात्र या वेळी नामाला चिकटून राहणे सोपेही नाही. आपल्याला नाम किती साधले आहे याची या दोन्ही ठिकाणी सहजच परिक्षा होऊन जाते.

आपल्या देशात ऋषी-मुनींनी आहारशास्त्राचे जेवढे चिंतन आणि प्रयोग केले आहेत तेवढे या जगात इतर कोणत्या देशाने केलेले नाहीत. आई रागावली असेल तर तिने बाळाला दूध पाजू नये कारण दुधातून क्रोध संक्रमित होतो. जेवताना, स्वयंपाक करताना मन प्रसन्न असावे. अन्न शिजवताना त्याला भगवन्नामाची जोड द्यावी आणि जेवताना जेवणापूर्वी श्लोक म्हणावेत. कारण जेवण हे सुध्दा यज्ञकर्म आहे. म्हणून

भगवद्-चिंतनात जेवायचे.

रामनाम ग्रासोग्रासी । तो जेविलाची उपवासी ॥

असे तुकाराम महाराज म्हणतात. आणखी एका अभंगात ते म्हणतात - पवित्र ते अन्न । हरिचिंतने भोजन ।

तुका म्हणे चवी आले जे का मिश्रित विठ्ठले ॥

शांतपणे भोजन केले तर शिळे भाकरीसुद्धा गोड लागते. त्यासाठी स्वयंपाकघर /जेवणघर प्रसन्न असावे. दूरदर्शनवर कार्यक्रम पहात जेवण करणे म्हणजे अभद्र संस्कार आयात करणे. मधुर संगीत किंवा बासरी ऐकणाऱ्या गायी अधिक प्रमाणात दूध देतात. जनावरांची ही कथा तर माणसांनी वेडावाकडे का वागावे? जेवताना मंत्र अथवा श्लोक म्हटले तर प्रकृतीवर निश्चित अनुकूल परिणाम होईल. सर्वांना संस्कृत मंत्र किंवा संगीत येईलच असे नाही हे ध्यानात घेऊन 'गद्य घोष म्हणावे' असे सांगतात. घोष या शब्दातून मनमोकळा नामोच्चार सूचित होतो. अन्नाच्या स्थूल अंशातून रक्त आणि मांस तयार होते तर सूक्ष्म अंशातून मन आणि बुद्धी यांचे पोषण होते. (Cream) ईश्वरचिंतनामध्ये भोजन केल्याने अन्नातील काही दोष आपोआप नाहीसे होतात.

आपण खातो अन्नासी । अन्न खाते आपणासी ।

सर्वकाळ मानसी । चिंतातुर ॥

नामस्मरणाचे महत्त्व मान्य करूनही नामस्मरणासाठी वेळ मिळत नसल्याची तक्रार करणारे अनेक जण असतात. त्यांना समर्थ एक निश्चित आणि सोयीची वेळ सांगतात. जेवणाची वेळ तर हातातलीच आहे. पूर्वी जेवणापूर्वी त्रिसुपर्ण, गीताध्याय म्हणत असत. तेवढे शक्य नसले तरी काही श्लोक तरी आवश्यक आहेतच. त्याचे अनेक लाभ आहेत. अन्न नीट पचत नाही, अंगी लागत नाही याला मनःक्षोभ, चिंता, शोक, भय, ताण ही कारणे आहेत. नामस्मरणाने हा ताण उणावतो, क्रमाने नाहिसा होतो, आणि त्यामुळे अन्न सुखाने पचते, अंगी लागते. अन्नाचे सेवन यात अन्न मिळणे व प्रत्यक्ष खाणे हे येते. जीवनातील सर्वच व्यापार नामस्मरणाने युक्त झाले असले पाहिजेत. अन्नभक्षण हे त्याचे प्रवेशद्वार समजावे.

न ये राम वाणी तया थोर हाणी।
जनी वेर्थ प्राणी तया नाम काणी।
हरिनाम हे वेदशास्त्री पुराणी।
बहु आगळे बोलिली व्यासवाणी ॥१०॥

<u>अर्थ</u> - ज्याच्या वाणीत भगवंताचे नाम येत नाही त्याचे फार मोठे नुकसान होते. अशा माणसाचे जीवन व्यर्थ होय. तो अति क्षुद्र समजावा. वेद, शास्त्रे व पुराणे यामध्ये व्यासांनी भगवंताच्या नामाच्या श्रेष्ठपणाबद्दल पुष्कळच सांगून ठेवले आहे.

<u>स्पष्टीकरण</u> - भारतीय संस्कृति अध्यात्मप्रधान असल्याने त्यात भगवंताचे दर्शन हे परमोच्च ध्येय मानले जाते. भगवंताचे नाम घेणे हे त्या ध्येयाचे दैनंदिन साधन आहे. त्यामुळे जो नाम घेत नाही त्याची फार हानी होते. या परमोच्च ध्येयाचे वर्णन वेदांपासून ते अलीकडील संत वाङ्मयात आढळते.

भगवंताचे नाम मुखाला न येणे म्हणजे स्वतःला सुधारण्याचे सर्व मार्ग बंद करणे आहे. नामदेव महाराज म्हणतात नामाविण मुख सर्पाचे ते बीळ आपल्या मुखातून विष बाहेर पडू नये म्हणून नामामृताचे सेवन करावे. जो नाम घेत नाही अशा मनुष्याला समर्थ काणी म्हणतात. काणी म्हणजे पोरातून काढा पडलेला जोंधळा. नाम न घेणारा माणूस असा आतून सडून जातो. म.व्यासांनी भागवत कथा लिहिली ते लोकांना नामसाधनेला लावण्यासाठीच! निदान माणसाला स्वतःचे हित कळावे म्हणून तरी त्याने नामाची कास धरावी.

नामस्मरणाविषयी प्रेम वाटत नसेल तरी ते साहजिक आहे कारण प्रेम जबरीने उत्पन्न करता येत नाही. पण कर्मेंद्रियांचे तसे नाही. नुसत्या वाणीने नाम घ्यायचे ठरवले तर ते शक्य आहे पण जो काटा तेही घेत नाही त्याची फारच हानी होते. सर्व संतांनी अशा माणसाची संतापून निंदा केली आहे. शिव्या दिल्या आहेत. पण त्या प्रेमापोटी. एखाद्या नाठाळ मुलाला आईने कळवळून 'मेल्या' म्हणावे तसे हे आहे.

© www.madhaveeragnuveer.com

नको वीट मानू रघुनायेकाचा।
अती आदरे बोलिजे राम वाचा।
न वेचे मुखीं सापडे रे फुकाचा।
करी घोष त्या जानकीवल्लभाचा ॥९१॥

अर्थ - अरे मना, भगवंताचा कंटाळा करु नकोस. भगवंत नकोसा होऊ देऊ नकोस. अतिशय पूज्य भाव ठेवून वाचेने नाम घे. असे करण्याने तुझे काहीच खर्च होणार नाही. मुखाने नाम घेत राहिल्याने भगवंत विनाकष्ट साध्य होतो. म्हणून त्या भगवंताच्या नामाचा सतत घोष करावा.

स्पष्टीकरण - परमार्थसाधनेमधील मुख्य अडचण म्हणजे साधकाच्या मनामध्ये भगवंताच्या दर्शनाचे ध्येय सतत ताजेपणाने टिकत नाही. ते म्लान होते. कोमेजून जाते. मनाची ओढ दृश्याकडे असते त्यामुळे ते फार काळ भगवंतामध्ये गुंतत नाही. अशा वेळी साधकाने फार सावधपणे वागावे. आपले ध्येयप्रेम काही काळ म्लान झाले तरी आपली नामसाधना पूर्वीप्रमाणे चालू ठेवावी. इतर साधनांच्या बाबतीत काहीतरी किंमत द्यावी लागते. पण इथे काही सोडायचे नाही, मांडायचे नाही. नुसता स्वतःकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलायचा आहे. आपण आपलीच भेट घ्यायची आहे. स्वरूपाचे दर्शन म्हणजे भगवंताचे दर्शन आहे.

एकच कल्पना समर्थ अनेक प्रकारांनी पुन्हा पुन्हा सांगत आहेत. त्यांच्या (साधकांच्या) मनावर ठसण्यासाठी ही पुनरावृत्ती आहे. पण सतत आग्रहाने सांगण्याचा कंटाळाही येऊ शकतो. आपल्या हिताचे कोणी सांगू लागला तर ते ऐकण्याची मनःस्थिती असतेच असे नाही. अभ्यास, शिस्त, व्यवस्थापन याविषयी युवकांना सांगायला लागले तर त्यांना बोअर होते.

गोंदवलेकर महाराजांचा तर नामसाधनेवर भर आहे. त्यांच्या रोजच्या प्रवचनातून ते भक्तांच्या मनावर पुन्हा पुन्हा ठसवतात. रोज एक प्रवचन वाचले तर नामाबद्दल प्रेम उत्पन्न होईल.

देव मस्तकी धरावा। अवघा हलकल्लोळ करावा॥

असे समर्थ सांगतात. उत्सवातून उत्साहाचे वातावरण निर्माण होते

वाक्य - अवाक्य
हृस्व - दीर्घ
अक्षर - क्षर
नाम - प्रमाण
मृत्यु - अमृत

नाम स्मरे अती आदरे सर्व ही नाम घोषें।
गिरिकंदरे जाइजे दूरि दोषें।
हरि तिष्ठतु तोषला नाम तोषें।
विशेषे हरा मानसी रामपीसे ॥१२॥

अर्थ - जो कोणी अतिशय पूज्यभावाने नामस्मरण करतो त्याचे सारे दोष दूर गिरीकंदरी पळून जातात. ज्या ठिकाणी भगवंताच्या नामाचा घोष चालतो त्या ठिकाणी भगवंत अत्यंत संतोष पावून वास्तव्य करतो. श्रीशंकराच्या मनाला रामनामाचे विशेष वेड लागलेले आढळते.

स्पष्टीकरण - प्रत्येक व्यक्ती ही अपूर्ण आहे. ती अपूर्णता नाहीशी झाली की भगवंताचे दर्शन घडते. भगवंताच्या आड येणाऱ्या गोष्टी दूर सारल्या की काम झाले. भगवंताच्या नामामुळे हे सर्व अडसर दूर होतात. जोवर मीपणा आहे तोवर भगवंत भेटणार नाही. नामघोषाने मीपणा क्षीण होतो. आणि भगवंताचे आस्तित्व प्रगट होते. जोपर्यंत नामाचे अनुसंधान तोपर्यंत भगवंताच्या सान्निध्याचे भान असते. परंतु नामाचे अनुसंधान सतत कसे टिकणार? त्यासाठी नामाचे वेड लागावे लागते. असे वेड श्रीशंकरांना नामाचे लागले होते. म्हणून पुन्हा पुन्हा त्यांचे उदाहरण देतात.

अनेकदा मनातल्या मनात जप शक्य होत नाही. मन हे चंचल असल्यामुळे भरकटत रहाते. म्हणून समर्थ वैखरीने नामघोष करायला सांगतात. नाम घेण्यासाठी आपल्याला गिरिकंदरी जाण्याची जरूरी नाही. नामाच्या भयाने आपल्यातील दोषच गिरिकंदरी पळून जातील. नाम आणि दोष यांचे नाते सूर्य व अंधारासारखे आहे. सूर्यासमोर अंधार टिकत नाही. तसेच नामाला दोष सहन होत नाहीत. याबाबत सर्व संतांचे एकमत आहे हरिपाठात माऊली म्हणतात.

हरि उच्चारणी अनंत पापराशी। जातील लयासी क्षणमात्रे।
तृण अग्निमेळे समरस झाले। तैसे नामे केले जपता हरी॥

तर ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वर म्हणतात.

कीर्तनाचेनि नटनाचे। नाशिले पर्वत पापाचे।
जे नामाचे नाही पापाचे। ऐसे केले॥

भगवंताच्या नामाने पापाची नागेनिराणी नाहीशी होते.

© www.madhaveeagniveer.com

घेता नाम विठोबाचे | पाप ते जळोनी पायांची |
ऐसा नामाचा महिमा | वेद शिणला श्रांती शिणला |

सततच्या नामाने आपल्या शरीराचे रसायनच बदलून जाते. समर्थांनी आदरपूर्वक नाम घ्यायला सांगितले आहे.

भगवंत नामाने तुष्ट होतो आणि त्या भक्ताच्या घरात थांबतो. गोंदवलेकर महाराज तर म्हणतात - जो नाम घेतो त्याच्या दारामध्ये मी कुत्र्यासारखा पडलेला असतो. नामाबद्दलच्या तळमळीची ही परिसीमा आहे. तर भागवतामध्ये भगवंत म्हणतात—

नाहं वसामि वैकुण्ठे योगिनाम् हृदये रवौ |
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ||

रामकृष्ण परमहंसांच्या एका शिष्याला दारूचे व्यसन होते अनेक प्रयत्न करूनसुद्धा ते सुटत नव्हते. तेव्हा ठाकूरजी त्यांना म्हणाले. तू दारू पिण्यापूर्वी माझे स्मरण करून त्या दारूचा नैवेद्य मला दाखव आणि मग पी. एकदोनदा त्याने तसे केले पण लगेचच त्याला त्या कृतीचा उबग आला. व पश्चात्तापाने त्याचे अंतःकरण भरून आले आणि त्याच क्षणी त्याचे दारूचे व्यसन सुटले. आदरणीय व पूजनीय संतांसमोर व्यसने राहू शकत नाहीत. ती पळ काढतात. त्याचप्रमाणे अत्यंत श्रद्धेने नाम घेत राहिले तर हातून घडत असणाऱ्या दुष्कृत्यांविषयी तिरस्कार वाटू लागतो.

अशा नामस्मरणाने परमेश्वर संतुष्ट होतो. आणि भक्ताला दर्शन देण्यासाठी आपण होऊन पुढे येऊन उभा रहातो. भगवान शंकरांसारख्या देवाधिदेवांचे अंतःकरण ही रामनामाच्या उच्चाराने धेडावलेले आहे. शंकरांना जर रामनामाचे वेड लागते तर सामान्यांना ते का लागू नये?

© www.madhaveragruveer.com

जगी पाहता देव हा अन्नदाता।
तया लागली तत्त्वता सार चिंता।
तयाचे मुखी नाम घेता फुकाचे।
मना सांग पां रे तुझे काय वेचे ॥६३॥

अर्थ - जगाकडे पाहिले तर भगवंत सर्व जीवांचे धारणपोषण करतो असे दिसते. वास्तविक भगवंतच सर्व जीवांची सर्वप्रकारे काळजी घेतो. मना, भगवंताचे फुकटचे नाम घ्यायला काय जाते?
स्पष्टीकरण - या श्लोकात वापरलेली भक्तीची भाषा थोडी बाजूला ठेवली तरी जगात अनुभव असा येतो की निदान जगण्यापुरते खायला सहसा कमी पडत नाही. मात्र माणसाच्या स्वार्थीपणामुळे काही लोकांना अन्नाचा तुटवडा भासतो.

मानवी जीवन भगवंताचे दर्शन घेण्यासाठी वापरायला हवे. ही जाणीव ठेवून जगणाऱ्याला देहधारणेपुरते तरी अन्न मिळतेच. कोणी साधनी माणूस अन्न मिळत नाही म्हणून मेल्याचे ऐकिवात नाही.

संतांचा अनुभव असा की ज्या सूक्ष्म व जाणत्या सत्तेमुळे माणूस या जगामध्ये येतो तीच त्याच्या धारणपोषणाची व्यवस्था करून ठेवते. माणसाने तिच्या पाठिंब्याची मनापासून नुसती जाणीव ठेवली म्हणजे पुरे. आत्मसत्तेचे सामर्थ्य अनंत व अपार आहे. तिच्यावर श्रद्धा ठेवणाऱ्याला काही कमी पडणार नाही.

परमेश्वर आधी चारा निर्माण करतो व मग पिल्लाला जन्म देतो. मातेच्या स्तनात आधी दूध निर्माण होते व मग मूल जन्माला येते.

अजगर न करे नौकरी पंछी न करे काम।
दास मलिक कह गये सबका दाता राम॥

गडहिंग्लजजवळ सामानगड नावाचा किल्ला आहे. १६६० साली दुष्काळ पडला तेव्हा गोर गरीबांना रोजगार मिळावा म्हणून शिवाजी महाराजांनी दुष्काळी कामे काढली. समर्थ तिथे आले असताना महाराजांनी चालू असलेले बांधकाम दाखवले. खरे तर महाराज सश्रद्ध व विनम्र होते पण तरीसुद्धा त्यांच्या बोलण्यात थोडासा अहंभाव डोकावला. या महापुरुषाच्या अंतःकरणाला अहं

विचारांचा स्पर्श सुद्धा होऊ नये या वात्सल्यभावनेने त्यांनी शिवछत्रपतींना बेलदाराकरवी एक खडक फोडायला सांगितला. बेलदाराने तो फोडताक्षणीच त्या खडकातून एक कोटरभर पाणी व त्यात जिवंत बेडकी होती. ही ईश्वरी योजना पाहून दोघेही थक्क झाले.

खडक फोडिता सजीव रोडकी। पाहिली सर्वांनी बेडकी।
सिंधु नसता तिथे मुखी। पाणी। कोण पाजितो।
आम्ही काय कुणाचे खातो। रे तो राम आम्हाला देतो।।

आपल्याकडे नैवेद्य ही कल्पना कृतज्ञतेपोटीच जन्माला आली आहे. ज्याच्या कृपेने आपल्याला दोन घास मिळतात त्याचे स्मरण व्हावे म्हणून हा उपचार आहे.

माणूस धरणे बांधतो पण पाऊस पाडण्याचे काम परमेश्वर स्वतःच करतो. परमेश्वराने भूक निर्माण केली म्हणून जेवणाचा आनंद मिळतो. आपले शरीर अमूल्य आहे त्याबद्दल ईश्वराचे आभार मानले पाहिजेत. ज्याने एवढे सर्व आपल्याला दिले त्याचे फुकटचे नाम घ्यायला तुझे काय खर्च होते?

जिस यारने नयन दी उसे सुमिरन बार बार।
जिस यारने नाक दिया उसे भूल गयी पार।। कबीर.

ईश्वराचे स्मरण करण्यात कृतज्ञता आहे. तर कृतघ्नपणा हे फार मोठे पातक आहे. कृतघ्ने नास्ति निष्कृतिः। सर्व सृष्टी परमेश्वराच्या कृपेने चालते. तोच अन्नदाता आहे. आभार मानताना वरवरचे नसावे. मोरोपंत म्हणतात -

"देवा तू मला कार्यक्षम इंद्रिये दिलीस. माणसाच्या जन्माला घातलेस. खाण्यापिण्याची सोय केलीस. चांगले वाईट कळण्याची पात्रता दिलीस. सदाचाराची आवड दिलीस. कीर्तनश्रवणाचे प्रेम दिलेस. कितीतरी तू मला दिलेस."

कृतज्ञतेचा हा भाव संतांनी बाळगलेला असतो.

तिन्ही लोक जाळू शके कोप येता।
निवाला हरू तो मुखे नाम घेता।
जपे आदरे पार्वती विश्वमाता।
म्हणोनी म्हणा ते चि हे नाम आता॥ ९७॥

अर्थ - महादेव श्रीशंकर राग आला तर त्रिभुवनास जाळू शकतात. पण भगवंताच्या नामस्मरणाने त्यांचा दाह शमला. त्याचप्रमाणे विश्व निर्माण करणारी पार्वतीमाता देखील मोठ्या आदराने नाम घेते. हे जाणून प्रत्येकाने नाम घ्यावे.

स्पष्टीकरण - स्वभावातील तापटपणा हा सर्वत्रपणे आढळणारा मोठा दोष आहे. भगवान शंकरांनी नामाच्या बळावर या दोषावर मात केली आहे. पती क्रोधी असेल तर सर्वाधिक त्रास पत्नीला होतो. आपला पती रामनामाने शांत झालेला पाहून देवी पार्वतीदेखील आदरपूर्वक रामनाम घेऊ लागली. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपणही रामनाम घ्यावे.

© www.madhaveelaghuveer.com

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।

Date 4.10.2013
Page

अपि चेदसि पापेभ्यः

अजामेळ पापी वदे पुत्रकामे।
तया मुक्ति नारायणाचेनि नामे।
शुकाकारणे कुंटणी रामवाणी।
मुखे बोलता ख्याति जाली पुराणी॥६५॥

अर्थ - पापी अजामेळ अंतकाळी पुत्रामध्ये गुंतला. त्या मुलाचे नाव नारायण. नारायणाच्या नामाने अजामेळास मुक्ती मिळाली. आपल्या पोपटाला राम राम म्हणायला शिकवणारी गणिका त्या नामस्मरणाने उध्दरली व पुराणांतरी नाव करुन गेली.

स्पष्टीकरण - अजामेळ नावाचा ब्राह्मण स्वैराचारी व दुर्वर्तनी होता. त्याचे सारे आयुष्य इंद्रियांच्या दास्यामध्ये गेले. त्याचा लाडका पुत्र नारायण. हा त्याच्या प्रेमाचा विषय होता. अंतकाळी बहुधा त्याच्याजवळ तो नसावा तेव्हा अरे नारायणा, नारायणा असे काकुळतीने तो म्हणत होता. त्याला घेऊन जाण्यासाठी यमदूत आले असता त्याचा 'नारायणा नारायणा' हा धावा ऐकून विष्णुदूतही मदतीस धावून आले. तेव्हा विष्णुदूतांपुढे यमदूतांचे काही चालेना. अखेर यमदूत हात हलवीत निघून गेले. आणि अजामेळ्याचे प्राण वाचले. केवळ पुत्राच्या निमित्ताने हाक मारल्याने भगवंत धावून येतो तर आपण जर नित्य आराधना केली तर! हा विचार मनात येऊन अजामेळ नित्य अनुसंधानात राहू लागला व मुक्त झाला.

तशीच दुसरी कथा पिंगला नावाच्या वेश्येची आहे ती आपल्या पोपटाला बोलायला शिकवत होती. त्यानिमित्ताने तिच्या मुखात रामनाम स्थिरावले. रामनामाचा पुन्हा पुन्हा उच्चार झाला. आणि पुराणात रामभक्त म्हणून तिचे नाव अजरामर झाले. केवळ रामनामाच्या बळाने ती उध्दरुन गेली.

जर रामनामाने खालच्या निम्नस्तरीय लोकांचा उध्दार होतो तर आपल्यासारख्या पापभीरु लोकांचा उध्दार का नाही होणार? असा आशावाद आपल्या मनात निर्माण होतो.

© www.madhaveeraghuveer.com

महा भक्त प्रल्हाद हा दैत्यकुळी।
जपे रामनामावळी नित्यकाळी।
पिता पापरूपी तया देखवेना।
जनी दैत्य तो नाम मुखे म्हणेना॥ ८६॥

अर्थ - श्रेष्ठ भक्त प्रल्हाद राक्षसकुळात जन्माला आला. पण तो अखंड रामनामाचा जप करत असे. त्याचा बाप हिरण्यकशिपु मोठाच पापी होता. त्याला प्रल्हादाचे नामस्मरण पाहवेना. सहन होईना. त्याने स्वतः कधीही रामनाम घेतले नाही.

स्पष्टीकरण - नामस्मरणाचा प्रभाव दाखवण्यासाठी समर्थ निरनिराळी उदाहरणे देतात. अजामेळ आणि गणिका हे दोघेही नैतिकदृष्ट्या योग्य नव्हते. प्रल्हाद मात्र दैत्यकुळात जन्माला येऊनही दैवी गुणांनी संपन्न होता. अत्यंत नीतिमान माणूस भगवत्कृपेला प्राप्त होतो. तसेच नीतिदृष्ट्या कमी असलेला मनुष्य सुद्धा भगवंताच्या नामाने शुद्ध बनून भगवंताच्या दर्शनास पात्र ठरतो.

मानवी व्यक्तिमत्व गुंतागुंतीचे आहे. अंतर्यामी कोणता संस्कार दडलेला असेल ते सांगता येत नाही. अध्यात्माचा संस्कार सुप्त असेल तर भगवंताच्या नामाने तो जागा होतो. तेव्हा त्या व्यक्तीचे पूर्वायुष्य अध्यात्माला अनुकूल नसूनसुद्धा एकाएकी तिच्या जीवनात अध्यात्माचा प्रकाश दृष्टीला पडतो. ती व्यक्ती आतबाहेर बदलून जाते. अजामेळ आणि गणिका यांच्या बाबतीत असेच घडून आले. अध्यात्माचा प्रबळ संस्कार जागा असेल तर बाहेरील परिस्थिती त्याची वाट अडवू शकत नाही. हे प्रल्हादाच्या उदाहरणावरून दिसून येते.

हिरण्यकशिपुची पत्नी कयाधू गर्भवती असताना त्याला एका युद्धावर जाण्याचा प्रसंग येतो. तेव्हा सुरक्षिततेच्या दृष्टीने तो आपल्या पत्नीला नारदमुनींच्या आश्रमात ठेवतो. शेवटी दुष्ट माणसाला सुद्धा भगवद्भक्ताचाच भरवसा वाटतो. तिथे नारदांच्या आश्रमातील भगवद्भक्तीचे संस्कार त्या गर्भावर होतात. व त्यामुळे स्वाभाविकपणे प्रल्हाद हा भगवद्भक्त झाला.

वास्तविक दैत्यकुळ हे भगवद्भक्तीला प्रतिकूल असले तरी सुद्धा प्रल्हादाने नामसाधना पुढे चालू ठेवली. त्याने ॐ नमो भगवते वासुदेवाय हा जप सतत जपला. परंतु इथे

समर्थ म्हणतात की 'जपे रामनामावळी'. याचा अर्थ असा की समर्थांच्या दृष्टीने वासुदेवाचे नाम आणि रामाचे नाम एकंच आहे. अजामेळ ब्राह्मण कुटुंबात जन्म घेऊन पापी होता तर प्रल्हाद हा दैत्यकुळात जन्माला येऊनही महाभक्त होता. पण रामनामामुळे दोघेही धन्य झाले. याउलट हिरण्यकश्यपुच्या पापाचा जोर एवढा होता की त्याच्या मुखी रामनाम कधी आलेच नाही. मात्र प्रल्हादासारख्या भक्ताचे पितृत्व लाभल्यामुळे त्याला भगवंताचे नरसिंह अवतारात दर्शन झाले. आणि त्याचा अंत भगवंताच्या मांडीवर झाला.

हिरण्यकश्यपु हा आसुरी संपत्तीचे मूर्तिमंत प्रतीक होता. दैवी संपत्ती व आसुरी संपत्ती या मनुष्याच्या हृदयातील दोन प्रकारच्या प्रवृत्ती आहेत. दैवी संपत्तीच्या बळावर या दुर्गुणांवर मात करायची असते. त्यासाठी नामस्मरण लाभदायी ठरते. मनुष्याने नामस्मरणाची उपेक्षा करू नये म्हणून संतांची तळमळ असते. हिरण्यकश्यपुचा उन्मत्तपणा टोकाला गेला होता. त्याने आपल्या मुलाला ठार मारण्याचे सर्वप्रकारे प्रयत्न केले पण ते सर्व वाया गेले. तेव्हा तुझा रक्षणकर्ता कोण व कुठे आहे असे विचारताच प्रल्हादाने हसून उत्तर दिले.

सर्वत्रास्ति सदास्ति किं बहु गिरा त्वय्यास्ति मय्यास्ति च।

नाममहात्म्य अगाध आहे. नामाने सर्व पातकांचा नाश होतो. पण म्हणून पापे करत रहावी व नाम घ्यावे असा अर्थ नाही.

मनी नसे तरी नसो। परी वाचे तरी वसो॥ ही सवड माणसाची अगतिकता, अपूर्णता, दुर्बलता लक्षात घेऊन दिली आहे. नाम घेतो या बळावर अनाचाराने वागून चालणार नाही. नाम अत्यंत भक्तीभावाने घेतले तर त्याचा परिणाम चटकन होतो. तिथे दंभाला केचकलेला वाव नाही.

रामनाम सब कोई लेत ठक ठाकुर अरु चोर।
जिस नामसे ध्रुव प्रह्लाद तरे वह नाम कुछ और॥

ईश्वराचे कोणतेही नाम, नामस्मरणांच्या दृष्टीने सारखेच आहे. नारायण, वासुदेव, श्रीहरी किंवा रामनाम सारखेच आहे. येथे संतांची अनाग्रही वृत्ती दिसून येते.

मुखी नाम नाही तया मुक्ति कैंची।
अहंतागुणे यातना ते फुकाची।
पुढे अंत येईल तो दैन्यवाणा।
म्हणोनि म्हणा रे म्हणा देवराणा॥ ६७॥

अर्थ - ज्याच्या मुखात भगवंताचे नाम नाही त्याला मुक्ति मिळणे शक्य आहे काय? कर्तेपणाच्या अभिमानाने तो उगीचच यातना भोगतो. अशा माणसाला दैन्यवाणे मरण येते. म्हणून सर्वांनी भगवंताचे नाम घ्यावेच घ्यावे.

स्पष्टीकरण - प्रत्येकाला हे जग सोडून जायचे आहे हे निश्चित। तेव्हा इथून जाताना मन कशात अडकणार नाही याची काळजी शहाण्या माणसाने घ्यावी. ज्याची देहबुद्धी प्रबळ असते त्याचे मन दृश्य वस्तूंमध्ये अडकते. मग देह सोडताना यातना होतात भगवंताचे नाम घेणाऱ्या माणसाचे मन नामात स्थिरावू लागते त्यामुळे जिवंतपणी सुद्धा त्याचे मन संसारात अडकत नाही त्यामुळे अंतकाळी त्याला कष्ट होत नाही.

मात्र मुखी नाम येण्यासाठी सुद्धा पूर्वपुण्याई लागते वृद्धापकाळ व अंतकाळ हे मानवी जीवनातील कटुसत्य आहे. ते अनिवार्य आहे. तक्रार कुरकुर न करता त्याचा स्वीकार करावा. इतरांना - मुले सुना, नातवंडे यांना दोष देत बसून वेळ वाया घालवण्यापेक्षा भगवत् चिंतनात मन रमवावे. ईश्वरनिष्ठा आणि नामजप यांच्याशिवाय उद्धाराचे दुसरे साधन नाही.

शरीराची कार्यक्षमता टिकून आहे, सुखोपभोगाची साधने उपलब्ध आहेत तोवर ईश्वर मानत नाही हे म्हणण्याची मूर्ख ऐट थोडी जरी निभते परंतु शरीर दुबळे झाले, विषयोपभोगाची शक्ती कमी झाली. धनादि साधने उणावली, परिवारातील लोक विचारेनासे झाले तेव्हा जीवन यातनामय व दीन होऊन जाते. मात्र तेव्हा फार उशीर झालेला असतो.

कोणाचे हे घर कोणाचा संसार। सांडुनी जोजार जाणे लागे।
जाणे लागे अंती एकले सेवट। वेर्थ खटपट सांडुनिया।
जन्मवरी देहे संसारी गोविले। नाही काही केले आत्महित।
आत्महित गेले संसाराचे वाढी। अंती कोण सोडी रामावीण।

आज जवानी पे इतरानेवाले कल पछताएगा।

Date 5.10.2018

हरीनाम नेमस्त पाषाण तारी।
बहू तारिले मानव देहधारी।
तया रामनामी सदा जो विकल्पी।
वदेना कदा जीव तो पापरूपी॥ ९८॥

अर्थ - भगवंताच्या नामाने पाषाणांना निश्चितपणे तारले. मग मानवदेहात वावरणाऱ्या कितीतरी जीवांना नामाने तारले यात नवल कसले? पण काही माणसांना भगवंताच्या नामाविषयी नेहमी संशयच येतो. भगवंताचे नाम न घेणारा पापी समजावा.

स्पष्टीकरण - अध्यात्मशास्त्रामध्ये मायानदीची कल्पना आढळते. जगात जन्मणारे असंख्य जीव - शेकडा नव्याण्णव टक्के या प्रवाहाच्या ओघात गरगरक्या खानात, खडकावर आपटतात आणि अखेर बेपत्ता होतात. परंतु भगवंताच्या नामाला घट्ट धरणारी माणसे मात्र सुखरूपपणे पैलतीराला पोहोचतात. मानवीजीवन अपूर्णतेने, अज्ञानाने, विफलतेने आणि दुःखाने भरलेले आहे. भगवंताच्या नामाचा अभ्यास केला असता हे जीवनातील दोष माणसांना बाधक ठरत नाही. तरीसुद्धा काही माणसांना त्याबद्दल संशय येतो. भगवंताचा विसर पडणे याला पाप म्हणतात, किंवा पापाने भरलेल्या जीवाला नामाचा विसर पडतो. या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत.

या श्लोकाचा संबंध रामायणातील सेतुबंधनाशी आहे. प्रभूंच्या वानरसेनेतील नल नामक वानराला असा वर होता की त्याने पाण्यात टाकलेला दगड बुडणार नाही तर तरंगेल. म्हणून रामप्रभूंनी सेतु बांधण्याचे कार्य त्याच्यावर सोपवले. परंतु आपल्या कर्तृत्वाचा नलाला अभिमान वाटू लागला आणि त्यामुळे दगड पाण्यावर स्थिरावेना. तेव्हा मारुतरायांनी प्रत्येक दगडावर राम राम अशी अक्षरे लिहिली आणि त्यामुळे दगड तरंगत स्थिर राहू लागले व सेतु व्यवस्थितपणे पूर्ण झाला.

ये मज्जन्ति निमज्जयन्ति च परान् ते प्रस्तरा दुस्तरे।
वार्धौ वीर तरन्ति वानरभटान् संतारयन्तेऽपि च।
नैते ग्रावगुणा न वारिधिगुणा नो वानराणां गुणाः।
श्रीमद्दाशरथेः प्रतापमहिमा सोऽयं समुज्जृम्भते॥

अगी धन्य वाराणसी पुण्यरासी।
तयेमाजी जाता गती पूर्वजांसी।
मुखे रामनामावळी नित्य काळी।
जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी॥८०॥

अर्थ - पुण्याने भरलेले काशीक्षेत्र जगात खरोखर धन्य आहे. काशीमध्ये देह ठेवला असता आपल्यासकट पूर्वजांना उत्तम गति मिळते. मुखाने सतत नाम घ्यावे ही हिताची गोष्ट प्रत्यक्ष श्री शिवशंकर तिथे जीवाच्या कानात सांगतात.

स्पष्टीकरण - धर्मशास्त्रावर विश्वास असणाऱ्या माणसांना तीर्थक्षेत्री मरण यावेसे वाटते. काशी हे भारतातील प्रथम क्रमांकाचे क्षेत्र आहे. काशीमध्ये मृत्यु येणे भाग्याचे समजले जाते - श्रीशंकर ही काशीची प्रधान देवता असल्याने तिथे मरणाऱ्या प्रत्येक जीवाला श्रीशंकर नामाचा उपदेश करतात अशी कल्पना आहे.

काशी हे सप्तपुरींपैकी एक पवित्र क्षेत्र आहे.

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः॥

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. विश्वेश्वर म्हणून काशी प्रसिद्ध आहे. मूळ नाव प्रकाशिका आहे. तिथे ज्ञानाचा प्रकाश आहे. अनेक वृद्ध आपला अंतकाळ काशीमध्ये घालवतात. कारण तिथे मृत्यु आला तर भगवान शंकर कानामध्ये रामनाम मंत्राचा उच्चार करतात. भगवान शंकरांचे सामर्थ्य असे की ज्यामुळे त्या जीवाला पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही. तो जीव मुक्त होतो. वे. रा. राजेश्वरशास्त्री द्रविड - वय ऐंशीच्या आसपास, अक्षरशः चार घास अन्न आणि गंगाजल एवढाच आहार. शरीर कृश, मुद्रा सुकलेली पण स्वर खणखणीत, व तेजस्वी डोळे असे गृहस्थ घोंगडी टाकून खाटेवर पडलेले असतात. सात्त्विक त्याग, अलोट धैर्य आणि असाधारण निष्ठा याचे मूर्तिमंत उदाहरण आहे.

कामदहन करणारे शंकर, चंद्रमौळी शंकर हे अत्यंत हितकर असा रामनामाचा उच्चार मरत्या जीवांच्या कानात करतात.

नामाचा महिमा जाणे शंकर। जना उपदेसी विश्वेश्वर।
वाराणसी मुक्ती क्षेत्र। रामनामे कळली॥

© www.madhaveeraghuveer.com

यथासांग रे कर्म तेही घडेना।
घडे कर्म तो पुण्य गाठी पडेना।
दया पाहता सर्व भूती असेना।
फुकाचे मुखी नाम तेही वसेना।। १००।।

अर्थ - माणसाच्या हातून सांगोपांग कर्म घडत नाही. बरे, जे कर्म घडते त्यात न्यून राहिल्याने त्याचे पुण्य पदरात पडत नाही. कर्म नाही तर नाही पण सर्व प्राणिमात्रांबद्दल अंतःकरणात दया असत नाही. बरे हे जाऊ द्या पण फुकटचे भगवंताचे नामदेखील मुखात रहात नाही.

स्पष्टीकरण - धर्मशास्त्राने कर्म करण्याचे काही नियम घालून दिले आहेत. नियमानुसार कर्म केले तर त्यातून पुण्य लाभते. परंतु अगदी शास्त्रविधिला धरून म्हणजे कोठेही न्यून न पडता होणे हे कठीण असते. आणि यामुळेच कर्म करण्याचे प्रमाण मोठे असून देखील त्या मानाने पुण्यसंचय घडत नाही. वास्तविक कर्माच्या विधिवत आचरणाने चित्तशुद्धी व्हायला पाहिजे तशी काही होत नाही.

देहबुद्धी कमी होणे किंवा स्वार्थ क्षीण होणे हे चित्तशुद्धीचे लक्षण आहे. त्यातूनच सर्व प्राणिमात्रांबद्दल दयावृत्ती जागते. त्याच्या अंतःकरणात दयाबुद्धी विकसते. त्याला जगामधील दुःख पहावत नाही. दुसऱ्याचे दुःख हरण करण्यासाठी दयाशील माणूस झीज सोसतो. त्यातून त्याचा स्वार्थ क्षीण होऊन तो आत्मानुभवास पात्र होतो.

घडे शास्त्रविहित कर्माचरण नाही, दयाबुद्धी नाही, तर मग निदान नामस्मरण तरी करावे. अखंड नाम घेत गेल्याने मन अंतर्मुख बनते. मनाला आत रमण्याची सवय झाली की देहबुद्धी क्षीण होते. क्षीण देहबुद्धी हेच परमार्थातील प्रगतीचे गमक समजावे. अशा माणसाच्या अंगी आपोआपच दया, क्षमा, शांती यांचा उदय होतो. त्याचा स्वार्थ जवळजवळ नाहीसाच होतो. भगवंताचे प्रेम हृदयात स्थिर होण्याची एक अनासक्त अवस्थाच त्याला प्राप्त होते.

कलियुगात इतके वैचारिक प्रदूषण आहे की यथासांग कर्म घडणे कठीण झाले आहे. अगदी द्वापारयुगामध्ये धर्मराजाला

सुदामा राजसूय यज्ञानंतर अहंकार झाला — सोनेरी मुंगूस - कथा.

अनेकदा आपण तीर्थयात्रा करतो, पण त्यामध्ये भक्तिभाव सोडून सर्व गोष्टी असतात. कुठेही खाणे, काहीही खाणे हे तर असतेच. राहण्याची थोडीही गैरसोय सहन होत नाही. देवाचे दर्शन, नामस्मरण या गोष्टी गौण ठरतात. देहाचे चोचले, फोटो काढणे हे मोठ्या प्रमाणात केले जाते. आणि पैशाच्या जोरावर भरपूर खरेदी करणे हे तर मोठ्या प्रमाणात होते. म्हणजे ज्या गोष्टी टाळायच्या हव्यात त्या भरपूर करून ही नुसती टिकमार्क करण्याची तीर्थयात्रा ठरते.

अनेक उद्योगपती मोठमोठी संगमरवरी मंदिरे बांधतात. पण त्यांच्या कारखान्यात कामगारांचे शोषण होत असते. लोक मोठमोठे यज्ञ आणि सत्संगाचे कार्यक्रम आयोजित करतात पण त्यांच्या घरात ही संपत्ति कशी आली याचा विचार कोण करतो? लग्नामध्ये बँडसाठी पंचवीस हजार खर्च करतील पण लग्न लावणाऱ्या ब्राह्मणाला पन्नास रुपये देताना खळखळ करतात. एका नरसे कुरा-कुरामध्ये पूजा केली तेव्हा दक्षिणेसाठी लाचार असणाऱ्या गुरुजींनी त्याप्रसंगी निमूटपणे पूजा सांगितली. त्यामुळे त्या कर्माचा जेवढा लाभ व्हायला हवा तेवढा होत नाही.

परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळे जे उणे पडेल ते एकवेळ सोडून दिले तरी आळस, उपेक्षा, तुच्छता, वंचना, विपरीत धारणा अश्रद्धा यामुळे जे चुकते त्याचे प्रमाण फार मोठे आहे. पुण्याहवाचनाच्या सुपाऱ्या, होमाचे तूप आणि दानाचा रुपया यांचे स्वरूप कसे असते ते सर्व जाणतात. सन्माननीय पाहुण्याला देण्यासाठी किंवा नवीन जावयाच्या उपयोगासाठी ज्या वस्तू आणल्या जातात त्यात प्रतीच्या वस्तू धार्मिक कारणासाठी वापरल्या जाव्यात अशी अपेक्षा आहे. लग्नसमारंभात धार्मिक विधींना महत्त्व कमी व स्वागतसमारंभाला जास्त महत्त्व असते. सुसज्ज घरामध्ये पत्रीपंचपात्र किंवा ताम्हण सापडत नाही. सुखविलासासाठी पैसे खर्च करताना हात सैल असतो परंतु धर्मकृत्ये कृपणतेने संकोचलेली राहतात.

दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।

असे दयेचे स्वरूप असेल तर ती खरी दया!